म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५३०.

[redacted]

REFBK-0019171

[redacted]

# ALLEGED
# FAVOURITISM
IN
# GOVERNMENT CONTRACTS.

# सरकारि मक्त्यांसंबंधीं
# आक्षेपित लाडकेपणा.

मुंबई क्रॉनिकलचे प्रसिद्ध संपादक मि. हार्निमन.

यानीं प्रसिद्ध केलेल्या इंग्रजी पुस्तकावरून तयार केलेलें

भाषांतरकारः—रा. कृ. का. फडके संपादक माजी हिंदुपंच.

प्रिंटर व पब्लिशर,

पी. बी. पाठक "पाठक आणि कंपनी प्रेस"

मुगभाटलेन गिरगांव मुंबई. नं. ४.

( सर्व प्रकारचे हक्क स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ४ आणे.

# प्राथमिक दोन शब्द.

औद्योगिक कमिशनची बैठक मुंबईस चालू असतां मेसर्स आदमजी पीरभाई आणि कंपनीचे मुख्य चालक मि. करीमभाई ए. पीरभाई यांनीं जी साक्ष दिली त्यांत हिंदी लष्करी खात्याचे मक्ते देतांना सरकारी अधिकाऱ्यांकडून इंग्रजांनी कारखानदारांस फाजील मदत देण्यांत येत असें विधान केल्या मुळें त्या साक्षीसंबंधानें जनतेंत बरीच चळवळ उडाली. या गंभीर विधानां संबंधानें सरकारानें स्वतंत्र चवकशी करावी 'मुंबई क्रनिकल' वर्तमान पत्रांत सरकारच्या एकपक्षीपणाबद्दल संपादकीय जोराचे लेख आल्यामुळें लोकांत विशेषच चळवळ उडाली. पुष्कळ लोकांच्या सूचनेवरून हे संपादकीय लेख मि. करीमभाई ए. पीरभाई यांच्या सविस्तर लेखी व तोंडी झालेल्या साक्षीसह लहानशा पुस्तक रूपानें प्रसिद्ध केले आहेत.

बी. जी. हार्निमन, संपादक बांबे क्रॉनिकल.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

प्रस्तुतची लढाई सुरू झाल्यानंतर सुरवातीला व्यापारांत फारशी उलाढाल झाली नव्हती. पण फ्रान्सशीं सुलभ रितीनें लढतां यावें या मीषा खालीं जर्मनीनें जेव्हां बेलजमसारख्या तटस्थ राष्ट्रावर स्वारी केली तेव्हां फारच थोडी तटस्थ वृत्ती धारण करणाऱ्या हालंडनें जर्मनीविरुद्ध एकदम लढाई पुकारली ही लढाई पुकारल्यावरही समुद्रांतील जर्मनीचा व्यापार अव्याहत चालू असल्यामुळें हिंदुस्थानासारख्या बऱ्याच दूरच्या देशावर या लढाईच्या ज्वाला फिरकूं शकल्या नाहींत. इग्लंडनें लढाई पुकारल्यामुळें हिंदुस्थानास पैसा व मनुष्य बळ इग्लंडांत पावें लागलें हें खरें पण ज्या अर्थी इग्लंडच्या साम्राज्य-

सं.नि. २५२



छत्रा खालीं हिंदुस्थान आहे त्या अर्थी राज्यनिष्ठेच्या कर्तव्यानें तसें करणें हिंदुस्थानास भाग आहे. पण आपल्या शत्रूचा व्यापार बंद पाडून नाक दाबलें असतां तोंड उघडेल या राजकीय पेचाचा उपयोग जेव्हां हालंडनें जर्मनी विरुद्ध केला ह्मणजे इग्लंडचा समुद्रावरील ताबा किती जबरदस्त आहे हें दाखविण्यासाठीं जेव्हां इग्लंडनें जर्मनीचा समुद्रावरील व्यापार अजीबात रसातळास पोंचविण्याचा प्रयत्न केला तेव्हां सुई टाचणीपासून अगडबंब-कोबंडी यंत्रापर्यंत सर्वस्वी परावलंबी असलेल्या हिंदुस्थानच्या बाह्यदेशीं व्यापारावर भयंकर आघात झाला. या भयंकर आघातामुळें ज्या गोष्टी पूर्वी कस्पटा-प्रमाणें मानल्या जात असत त्यांस त्यांच्या भारंभार सोन्यासारखी किंमत पडूं लागली. ही परिस्थिती केवळ हिंदुस्थानांतच झाली असें नाहीं तर खुद्द इग्लंडांतही कागद वगैरे संबंधानें झाली. तेव्हां हिंदुस्थानासारखी काम धेनू आपल्या जवळ असतां आपल्या पोरास पांढऱ्या रंगाचे पाणी, दूध म्हणून कां पाजावें लागत आहे असा प्रश्न इग्लंडांत उपस्थित झाला. या प्रश्नाची खुलासेवार सोडवणूक व्हावी म्हणून हिंदुस्थानांत ‘ औद्योगिक कमिशन ’ नेमण्यांत आलें, या कमिशनच्या बैठकी इतर कांहीं प्रदेशांत झाल्यावर कमिशन मुंबईस आलें. या कमिशनपुढें अद्मजी पीरभाई या कारखानदारांच्या तर्फे ह्या कारखान्याचे बराच काळ व्यवस्था पहाणारे व्यवस्थापक मि. करीमभाई यांची साक्ष झाली. ही साक्ष फार मनोरंजक तर आहेच पण शिवाय शितावरून भाताची परिक्षा यान्यायानें हिंदुस्थानांतील राज्यकारभार किती बेजबाबदार रितीनें केला जातो आणि त्या बेजबाबदार पणामुळें हिंदुस्थानांतील बाल्यदशेंत असणाऱ्या हिंदी व्यापाऱ्यांची, समजून उमजून नसेल कदाचित्, कशी गळचेपी केली जाते आणि ती गळचेपी युरोपियन व्यापाऱ्यास खिसे भरण्यास कशी साधनीभूत होते याचें अत्यंत मार्मिक चित्र मि. करीमभाई यांनी आपल्या साक्षींत दाखविलें आहे.

सदरहू चित्र हिंदी जनतेपुढें येऊं नये ह्मणून कमिशनच्या अध्यक्षांनी बरीच धडपड केली पण कोणीही खरा वाली नसणाऱ्या हिंदी जनतेच्या सुदैवानें मुंबईस ‘ धी बॉंबे क्रॉनिकल ’ नांवाच्या एका युरोपियानानें चालविलेल्या आन्हिक वर्तमानपत्रानें अध्यक्षांच्या धमकीस धाब्यावर बसवून

ती सर्व साक्ष प्रसिद्ध केली इतकेंच नव्हे तर त्यासंबंधानें अत्यंत झणझणीत टीकात्मक असे संपादकीय अग्र लेखही लिहिले. या वर्तमानपत्राच्या या धाडसाबद्दल हिंदी जनता त्या पत्राची कायमची ऋणी राहील यांत शंकाच नाहीं. हिंदुस्थानासारख्या अत्यंत कृतज्ञ आणि उपकारी देशाला तोंडावाटे दोन गोड शब्द बोलणाराही मिळू नये हें हिंदुस्थानच्या पूर्व परंपरागत पापाचें फल ईश्वर देत आहे असेंच म्हटलें पाहिजे. परंतु ‘ पश्चात्तापेन शुध्दति ’ या न्यायानें हिंदुस्थानाला त्या पूर्व परंपरागत पापाचा पश्चाताप होऊं लागला आहे म्हणून म्हणा अगर पापांची पूर्णता होऊन पुण्य पुढें येऊं लागलें आहे म्हणून म्हणा अलीकडे परलोकवासी मि. वेडरबर्न, डिग्बी वगैरे सद्गृहस्थ स्वार्थी स्वजाती यांच्या शिव्या खाऊन केवळ परमार्थ साधावा म्हणून हिंदुस्थानातर्फे वकिली करीत होते व आजही मिसेस बीझांट, मि. हार्निमन वगैरे सत्ताधारीच्या जातीचे सद्गृहस्थ हिंदी जनतेचा मनःपूर्वक गौरव करीत आहेत. असो–

मि. करीमभाई यांची साक्ष व त्यावरील संपादकीय स्फुट लेख एकत्र करून त्यांचें एक लहानसें पुस्तक मि. हार्निमन यांनी नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. सदरहू पुस्तक इंग्रजी भाषेंत असल्यामुळें महाराष्ट्रांतील हिंदी जनतेच्या मुळाशीं त्यांतील अमोघ रहस्य जाणें दुरापस्त असल्यामुळें त्याचा हुबेहुब तर्जुमा आम्ही आज मराठींत प्रसिद्ध करीत आहोंत.

सदरहू तर्जुमा करण्याची परवानगी मि. हार्निमन यांनी अत्यंत उदार अंतःकरणानें केवळ परमार्थ बुद्धीनें दिली याबद्दल आम्हीं त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

शेवटीं मि. हार्निमनसारखे स्वतःला आपल्या देशबंधूकडून नावडते ठरवून घेऊन हिंदुस्थानचे कींव करणारे पारमार्थिक आत्मे ईश्वर उत्तरोत्तर अधिक निर्माणकरो अशी त्या जगत्पालकांनीं अत्यंत कारुणिक रितीनें प्रार्थना करून हा लहानसा लेख आम्ही येथेंच पुरा करतों. ॐ तत्सत्.

**प्रकाशक.**

# सरकारी मक्त्यांसंबंधीं
# आक्षेपित लाडकेपणा.

## हिंदी उद्योगधंद्याच्या साहसास केला जाणारा अडथळा.

( ता. ३० नवंबर १९१७ च्या क्रॉनिकलवरून. )

काल मि. करीमभाई आदमजी पीरभाई यांनीं औद्योगिक कमिशन पुढें फार महत्वाची साक्ष दिली आहे. एक महत्वाचें औद्योगिक साहस करतांना आपल्या कारखान्यास उत्साह देण्याच्या कामीं सरकारानें कसे अडथळे आणले याचें चित्र ज्यांत आहे असा एक लेख आपल्या साक्षीबरोबरच पुरवणी बजा त्यांनीं याचवेळीं दिलेला आहे. या पुरवणी लेखांत लष्करी मक्ते देण्यासंबंधानेंच तक्रार करण्यांत आलेली आहे. सरकारच्या या नव्या औद्योगिक साहसास ज्यावेळीं कोणीही विचारीत नव्हता त्यावेळीं या व इतर हिंदी कारखानदारांनी मोठ्या साहसानें सरकारास साह्य देण्याचें कबूल केलें पण त्याचें प्रायश्चित्त म्हणून अलीकडे तशाप्रकारचे मक्ते त्या आयत्या वेळीं उपयोगी पडलेल्या हिंदी कारखानदारांस अंधारांतच ठेऊन चढाओढ करणाऱ्या इंग्रज कारखानदारांस देण्यांत येत आहेत. या प्रकरणासंबंधांत

सर थामस हॉलंड यांनी चमत्कारिक वर्तणूक दाखविली आहे. या बाबतींत चवकशी करण्याचें काम कमिशनचें नाहीं असें गृहीत धरून—कमिशनच्या लेखी प्रश्नांत या संबंधाचा एक स्वतंत्र प्रश्नच असतां असें गृहीत धरणें आश्चर्यकारकच होय—सदरहू गृहस्थ मि. करीमभाईच्या विधानांस उत्तर देण्याची तयारी करून आले असावेत असें दिसतें.

## निरुत्तरी पतन.

दुर्दैवानें सर थामस यांस प्रथम ग्रासे मक्षिकापातः अशीच माघार घ्यावी लागली. सरकारी मक्ते ज्यांस देण्यांत येतात अशी हिंदी कारखानदारांची एक यादी त्यांनीं वाचून दाखविली. यावर मि.करीमभाई यांनी असा प्रश्न केला कीं ' पण या कारखानदारांस त्याच्या प्रतिस्पर्धी इंग्रजी कारखानदारांच्या मानानें खरोखर मक्ते कितीसे दिले गेले आहेत?" या मि.करीमभाईच्या सर्वव्यापी महत्वाच्या मार्मिक प्रश्नास सर थॉमस यांस दुर्दैवानें उत्तर देतां आलें नाहीं. मि.करीमभाई यांनी असें स्पष्ट बोलून दाखविलें कीं,या प्रश्नाच्या उत्तरांतच सर्व गौप्यस्फोट आहे.आठ आण्याचें काम करण्याची हिंदी कारखानदारांची तयारी असतां त्यांस चार दोन पैचें काम देणें व त्यांच्या इंग्रज प्रतिस्पर्ध्यांचे कारखानें काम फार म्हणून नियमितवेळाहूनही जास्त मुदत चालू राहणे अशी परिस्थिति असतांना सरकारी यादींत हिंदी कारखानदारांचीं नांवें असण्यांत विशेष अर्थ नाहीं. यासंबंधानें जास्त बारकाईनें तपास करण्याचें काम कमिशनचें नाहीं या सर थॉमस यांच्या विधानाचा आह्मी जोरानें निषेध करतों हिंदुस्थानांत औद्योगिक उन्नती कशी करतां येईल याची चवकशी करण्यासाठीं नेमलेल्या कमिशननें इंग्रजी कारखानदारांस फाजील महत्व कां व कसें देण्यांत येतें याबद्दल उघड खुलासा करण्यांत आला असतां त्या प्रश्नाची अशा प्रकारें उडवा उडव करणें बरोबर नाहीं असें आह्मी स्पष्ट म्हणतो व लोकमतही

असेंच आहे असें आम्ही सरकारास बजावतों. मि. करीमभाईचीं विधानें स्पष्ट काटेतोल आहेत तेव्हां त्यांकडे सरकारचें लक्ष त्वरित गेलें पाहिजे. आपली साक्ष गुप्तपणानें देण्याचें मि. करीमभाई यांनी साफ नाकारलें. हा प्रश्न इतका महत्वाचा आहे कीं, त्याचा विस्तृत विचार आम्ही पुनः करणार आहोंत.

## पुरावा दाबून टाकण्याचा प्रयत्न.

हा विस्तृत लेख लिहिण्याच्या पूर्वीं या चवकशींत या गोष्टीबद्दलचा मि. करीमभाईचा पुरावा दाबून टाकण्याचा अश्लाघ्य प्रयत्न कमिशनच्या चेअरमनकडून करण्यांत आला याबद्दल आम्ही स्पष्ट निषेध प्रदर्शित करतों. सदर पुरावा वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करूं नये असें त्यांनी स्पष्ट सांगितलें. इतकेंच नाहीं तर, आम्हांस जी माहिती आहे त्यावरून असें दिसतें कीं, कमिशनच्या सेक्रेटरींनीं रिपोर्टरांस भेटून 'हा पुरावा वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होऊं नये अशी चेअरमननी आपली इच्छा प्रदर्शित केली आहे' असें सांगितलें ! नेहमी वाकून वागणाऱ्या 'असोशियेटेड प्रेस'च्या रिपोर्टरांनी या हुकमास आपली मान तुकावली आणि या हाजीहाजीस आणखीही कित्येक पत्रकार हुकार देतील अशी आमची खात्री आहे. पण अशा प्रकारचा महत्वाचा पुरावा लोकांच्या नजरेच्या आड करण्याचा अश्लाघ्य प्रयत्न आम्ही कधींही करणार नाहीं. मि. करीमभाई यांणी जो लेखी जबाब दिला आहे तो आम्ही आज जशाच्या तसाच प्रसिद्ध केला आहे आणि कमिशनपुढें जीं तोंडीं प्रश्नोत्तरें झालीं तीं उद्या देणार आहोंत. या प्रकरणीं आपलें कर्तव्य आणि अधिकार काय आहे यासंबंधानें सर थॉमस यांणी मुद्दाम डोळेझाक केली आहे असें दिसतें. तसेंच सरकारी अधिकाऱ्यांचा पक्ष घेणें व त्यांचें समर्थन करणें या कामींही त्यांची दिशाभूल झाली आहे. कमिशनला एक

ठरवून दिलेलें कर्तव्य करावयाचें आहे अर्थात तें कर्तव्य करतांना कांहीं लोकांचीं मनें दुखावतील किंवा काय याचा विधिनिषेध बाळगण्याचें कांहींच कारण नाहीं. आपलीं दोन स्वरूपें आहेत ही गोष्ट सर थॉमस विसरले आहेत असें दुर्दैवानें म्हणणें प्राप्त झालें आहे. पहिलें स्वरूप कमिशनचे चेअरमन हें व दुसरें दारूगोळा तयार करण्याच्या बोर्डाचे चेअरमन हें. या दुसऱ्या स्वरूपांत सरकारी अधिकाऱ्यांची बिनतनख्यानें तरफदारी करणें याचा अंतरभाव होतो.

सं. नि. २५८

# सरकार आणि सरकारी मक्ते.

नं. १.

( ता. ३ दिसेंबर १९१७ च्या क्रॉनिकलवरून. )

गेल्या आठवड्यांत औद्योगिक कमिशनपुढें मि. करीमभाई यांणीं जी विधानें केलीं आहेत त्यामुळें या शहरांत हिंदी लोकमत फार प्रक्षुब्ध झालें आहे असें आम्ही स्पष्ट म्हणतों. लष्करी खात्यांतील मक्ते युरोपियन कारखानदारांस देण्यांत सरकारानें जो पक्षपात दाखविला त्यासंबंधानें मि. करीमभाईच्या लेखी जवाबांत स्पष्ट आव्हान केलें असतां त्याबद्दल त्या कमिशनच्या चेअरमन साहेबांनी जी वर्तणूक दाखविली त्यावरून तर हिंदी लोक आश्चर्यानें थक्क झाले आहेत. या विषयासंबंधाची विस्तृत टीका आह्मी दोन तीन अंकांत करणार आहों व त्या विषयाची पूर्ण माहिती विशेष परिश्रम करून आम्ही जी मिळविली आहे तीहि आम्ही या लेखांत ग्रथित करणार आहोंत; परंतु तत्पूर्वी या साक्षीच्या वेळीं कमिशनच्या चेअरमन साहेबांनीं असें सांगितलें कीं हा विषय सार्वजनिक महत्वाचा नाहीं, कमिशनशीं या प्रश्नाचा संबंधच येत नाहीं आणि म्हणून अशा प्रकारचा पुरावा घेण्याचें कारण नाहीं आणि त्या विधानांत जे आरोप केले आहेत त्याबद्दल त्या त्या अधिकाऱ्यांचें समर्थन पुढें असल्याशिवाय तशा विधानांस प्रसिद्धी देणें गैर आहे; या प्रसिद्धीसंबंधानें वर्तमानपत्रकारांस 'कर्तव्य आणि जबाबदारी' यांचें शिक्षण देण्याचा चेअरमन यांणी केलेला प्रयत्न या संबंधानें दोन शब्द लिहिण्याचा आज आमचा विचार आहे.

सर साहेबांनी आम्हां पत्रकारांस जें बोधामृत पाजण्याचा प्रयत्न केला आहे तो कितपत फलप्रद झाला आहे तें पाहूं. कोणाही सन्माननीय पत्रांस किंवा त्याच्या संपादकांस या उपदेशाचा तिरस्कारच आला असता. पण सर साहेबांनीं हा उपदेश ज्यांस केला त्यांच्यावर ते म्हणतात ती जबाबदारी मुळीच नाहीं ही गोष्ट त्यांस माहीत असली पाहिजे होती. कमिशनपुढें जी चवकशी होईल ती लिहून काढण्यासाठींच ते लोक तेथें गेले होते; सर साहेबांचे किंवा इतर कोणाचेही हुकूम ऐकण्यास ते बांधलेले नव्हते. ते आपल्या धन्याची नोकरी योग्य तऱ्हेनें बजावण्यास मात्र बांधलेले होते. या धन्यांस सर साहेबांपासून कर्तव्याची दीक्षा घेण्याची किंवा उपदेश ऐकण्याची मुळींच गरज नाहीं.ते आपल्या जबाबदाऱ्या उत्तम तऱ्हेनें जाणत आहेत. तेव्हां सर साहेबांनी परोपदेशाचें पांडित्य करण्यापेक्षां हिंदुस्थानांतील उद्योगधंद्याची आज काय स्थिती आहे? ती स्थिती चालू परिस्थितीनें सुधारेल कीं अवनतीला जाईल आणि भविष्यत् काळीं ती वृद्धिंगत होण्यास काय केलें पाहिजे हें चवकशी करून शोधून काढण्यासाठीं नेमलेल्या कमिशनच्या अध्यक्षाची जनतेविषयींची जबाबदारी काय आहे याचें अध्ययन सरसाहेबानीं केलें असतें तर बरें झालें असतें. जे सद्गृहस्थ सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध विधानें करतात त्यांच्या साक्षीस धुत्कारून टाकणें अथवा कमिशनच्या चिटणीसास फाजील स्पष्ट पत्र लिहिल्याबद्दल फाजील तक्रार करणें--जणू काय अशीं तुटक पत्रें लिहिण्याची सवय सरकारी अधिकाऱ्यांस नाहींच--या गोष्टी वरील जबाबदारींत खासच येत नाहींत. तसेंच सार्वजनिक पैशाचा विनियोग अपात्रीं होऊं नये व रणांत लढणाऱ्या शिपायांची अकारण गैरसोय होऊं नये म्हणून ज्या विषयांची चर्चा सार्वजनिक रितीनेंच झाली पाहिजे त्या विषयासंबंधानें वर्तमानपत्रकारांची मुस्कुटदाबी करणें हें जबाबदारी समजल्याचें चिन्ह खासच नव्हे. मि. करीमभाई ज्या गोष्टी कमिशनपुढें मांडणार

होते त्या त्यांस मांडूं दिल्या असत्या-या मांडूं दिल्या पाहिजे होत्या-तर वर सांगितलेल्या गोष्टी जनतेस आपोआप कळल्या असत्या; अर्थात त्या दाबून ठेवल्यामुळें चवकशी पूर्ण तऱ्हेनें न करण्याचें महत्पाप सर थामस हॉलंड आणि त्यांचे साथीदार यांच्या माथीं पडलेलें आहे. या प्रकरणीं कमिशनमधील हिंदी मेंबरांनीं जी वर्तणूक दाखविली तीही चांगली नव्हती. जें कर्तव्य या मेंबरांस करणें भाग होतें त्या कर्तव्यापासून ते पराङ्मुख झाले आहेत आणि अध्यक्षांच्या हमकरेसो कायद्यास बळी पडले आहेत. अशा प्रकारें कर्तव्यापासून च्युत होण्याच्या ऐवजीं त्यांनीं त्याच वेळीं आपले राजीनामे द्यावयास पाहिजे होते.

आमच्या मुद्दाम पाठविलेल्या मुखत्यारानें सागितल्याप्रमाणें साक्षीदारास कमिशननें जे प्रश्न विचारावयाचे होते त्यांपैकीं एक या खालीं दिला देतो:—

'हिंदी उद्योगधंद्यांस उत्तेजन देण्याच्या बाबतींत स्टोअर्समध्यें माल विकत घेयासंबंधानें सरकारी खात्याकडून जे नियम सध्या प्रचारांत आहेत त्यावर टीकात्मक असें कांहीं आपणांस सांगावयाचें आहे काय ! या नियमांत कांहीं फेरफार करावेत असें तुम्हांस वाटतें काय ?'

चालू प्रकरणासंबंधानें हाच नियम लागूं पडतो एवढेंच आमचें म्हणणें नाहीं तर कमिशन ज्या कामाची चवकशी करण्यासाठीं बसलें आहे त्या कामाच्या धोरणानें पाहूं लागल्यास आम्ही म्हणतों कीं या प्रकरणाची अवश्य चवकशी झाली पाहिजे होती व असें कोणीही साधारण अकलेचा माणूस म्हणेल. आम्ही जो प्रश्न वर उद्धृत केला आहे त्या प्रश्नान्वयें मि. करीमभाई यांनी जो प्रश्न पुढें आणला होता त्याची चवकशी अवश्य व्हावयास पाहिजे होती. अधिकारी वर्गाशीं नेहमी न्यायानेंच वागलें पाहिजे हें सर साहेबांचें म्हणणें केवळ थोतांड आहे. अधिकाऱ्यांस बाधक अशीं कित्येक विधानें हरहमेश न्यायासनापुढें, वर्तमानपत्रांत आणि इतरत्र करण्यांत येतात; तसेंच तशीं विधानें केलीं

असतां त्या विधानांत गुरफटलेले अधिकारी रागावतील याचीही पर्वा करण्यांत येत नाहीं. अशा अधिकाऱ्यांनी वाटेल तर आपल्या तर्फेचा पुरावा किंवा समर्थन जनतेपुढें मांडावें. पण सर थॉमस हॉलंड यांच्या महान् सिद्धांताप्रमाणें अशा गोष्टींचा निकाल सरकारी अधिकाऱ्यांनीं उलट पक्षास आव्हान न करतांच करावा अथवा विधानापूर्वी समर्थन आले पाहिजे असें जर आपण ग्राह्य धरलें तर सार्वजनिक हिताची राखरांगोळीच झाली ह्मणावयाची. मेसापोटेमिया प्रकरणाचा रिपोर्ट सर साहेबांनीं वाचला आहे काय ? या रिपोर्टांत कांहींही चुका अगर वैगुण्यै असोत पण त्यांत एक गोष्ट अगदीं स्पष्ट केली आहे. ती गोष्ट हीच कीं, सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध ज्या गोष्टी बाहेर पडल्या असतील त्यांचा खरेखोटेपणा समजावून पाहाण्यास खुद्द सरकार कधींही पात्र असूं शकणार नाहीं. लोकहिताच्या कामीं फक्त एकच नियम पाळला गेला पाहिजे आणि तो हाच कीं, सर्व गोष्टी उजेडांत आणावयाच्या आणि त्या गोष्टींची चवकशी अशा रीतीनें करावयाची कीं, ही चवकशी गुप्त केली असतां त्यापासून अमूक अमूक तऱ्हेनें लोकहित नष्ट झालें असतें अथवा सार्वजनिक खात्यांतील गैरवर्तणुकीची छाननी व्हावी तशी झाली नसती हें जनतेस स्पष्टपणें समजलें पाहिजे. एखादा अधिकाऱ्याचा अरेरावी कारभार उघड होईल म्हणून एखादी गोष्ट दाबून टाकणें हें औद्योगिक कमिशनसारख्या सार्वजनिक संस्थेस शोभत नाहीं. अशारीतीनें दाबादावी न केली तर सरकार आपणास योग्य त्या सवलती देणार नाहीं, त्यांच्या दप्तरीं असलेली माहिती खुलासेवार मिळणार नाहीं आणि चवकशीच्या विषयासंबंधानें विस्तृत माहिती देणारा एखादा अनुभवी कामगार तें मिळवून देणार नाहीं अशी कल्पना करणें चुकीचें आहे. ‘ माझी उलट तपासणी पाहिजे तर करा. ’ असें स्पष्ट आव्हान मि. करीमभाई यांनीं केलें असल्यामुळें जर त्यांच्या प्रकरणाची चवकशी अजूनही

होणार नाहीं तर हें कमिशन आम्हीं म्हणतों त्याप्रमाणें कधींच काम करणार नाहीं.

हें प्रकरण आम्हीं जनतेपुढें अशा स्वरूपांत ठेवतों कीं त्यामुळें त्याची जाहीर चवकशी झालीच पाहिजे. या प्रकरणासंबंधानें शेवटचा निकाल आम्ही देण्याचें धाडस करीत नाहीं. पण मि. करीमभाई यांणीं केलेल्या विधानांवरून आणि ज्यांच्या सत्यतेबद्दल यत्किंचितही संशय नाहीं अशा आमच्याजवळ असलेल्या माहितीवरून हें प्रकरण अत्यंत गंभीर स्वरूपाचें आहे आणि आपल्या कारभारास फार मोठा काळिमा लागू नये अशी इच्छा असेल त्या स्वरूपासंबंधानें सरकारच्या त्या त्या खात्यांनी जाब दिला पाहिजे. या प्रकरणाचीं दोन भयंकर स्वरूपें आहेत. पहिलें साम्राज्यासाठीं लढणाऱ्या शिपायांच्या सुखाची हेळसांड करणें हें असून दुसरें सार्वजनिक पैशाची उधळपट्टी. साधनांची रेंळचेळ असतां त्यांचा फायदा न घेतां रणांगणावर लढणाऱ्या शिपायांची व्यर्थ गैरसोय करण्यांत आलेली आहे. आपल्या लाडक्या पण हिंदी उद्योगधंद्याशीं स्पर्धा करणाऱ्या इंग्रजी कारखानदारांस अधिक किंमत देऊन अधिक मालाची मागणी केल्यामुळें पैशाची--सार्वजनिक पैशाची--उघड उघड उधळपट्टी करण्यांत आली आहे. या प्रकरणाचा विस्तृत विचार आम्हीं उद्यां करणार आहों व या वर्णनावरून आम्ही कोणत्याही प्रकारची अतिशयोक्ति करीत नाहीं असें लोकांस स्पष्ट दिसून येईल.

# सरकार आणि सरकारी मक्ते.

नं. २

## ( ता. ४ दिसेंबर १९१७ च्या क्रॉनिकलवरून. )

लष्करी खात्यास तंबू आणि चांमड्याचें सामान पुरविण्याच्या कामीं हिंदी कारखानदारांशीं स्पर्धा करणाऱ्या इंग्रज कारखानदारांस फाजील मदत केल्याच्या गंभीर प्रकरणासंबंधानें आम्ही काल दोन प्रकार सांगितले होते. ते प्रकार येणेंप्रमाणें:—

( १ ) अशा प्रकारें फाजील मदत केल्यामुळें मेसोपोट्यामिया प्रांतांत असलेल्या इंग्रजी सेनेस विनाकारण भोगावे लागलेले हाल.

( २ ) हिंदी मक्तेदारांस द्याव्या लागणाऱ्या पैशापेक्षां या लाडुकपणा दाखविलेल्या इंग्रजी मक्तेदारांस जास्त पैसा द्यावा लागला व त्यामुळें कर भरणाऱ्या रयतेला पुष्कळसा पैसा विनाकारण जास्त द्यावा लागला. ( अ ) हा अधिक दिलेला दर मालाच्या अधिक चांगलेपणामुळें देण्यांत आला असें पुराव्यानें शाबीत झालेलें नाहीं. ( ब ) इतकेंच नाहीं तर या कारखानदारांस ज्या जिनसांबद्दल अधिक दर देण्यांत आला त्या जिनसा सरकारी ठरावा-प्रमाणें तयार करण्यांत आल्या नसतांही सरकारी इन्स्पेक्टरांनीं तशा जिनसा पास केल्या असाव्यात असा संशय आहे. पण याच कामीं हिंदी कारखान-दारांशीं विशेष कडक वर्तन ठेवण्यांत आलें होतें.

पहिल्या मुद्याचें स्पष्टचित्र वाचकाच्या हृदयावर उमटावें म्हणून आम्ही त्यांस इ. स. १९१६ च्या वसंत ऋतूंत मेसापोटेमिया प्रांतांत काय प्रकार चालला होता हें पहावयास सांगतो. जनरल मॉड यांच्या मृत्यूपूर्वी त्यांच्याच

 सं.ग्रं. २०२

हाताखालच्या एका अधिकाऱ्यानें त्यांची स्तुति करण्यासाठीं ' टाइम्स आफ इंडिया ' वर्तमानपत्रांत जो एक लेख लिहिला होता त्यांतील एक उतारा या खालीं दिला आहे. या लेखाच्या खरेपणाबद्दल संशय घेण्यास तिळभरही जागा नाहीं. डुजेला रिडौट या ठिकाणावर हल्ला करून पिच्छेहाट झाल्यावर जनरल मॉड व त्यांचें सैन्य अबूरोमन येथें तळ देऊन राहिलें होतें त्यावेळचा हा लेख आहे. हा लेखक म्हणतो:—

" या मुदतींत जनरल मॉड ८० पौंड वजनाच्या लहानशा तंबूत लिहित बसत. ही त्यांची लिहिण्याची वेळ इतक्या उन्हाची असें कीं, तशा उन्हांत त्यांच्याहून अधिक तरुण मनुष्य उन्हाळ्यानें तडफडून गेला असता. यावेळच्या सुमारास आम्हांस ई. पी. नांवाचे थोडेसे तंबू देण्यांत आले. **परंतु अशा प्रकारचे तंबू दवाखान्यांतील सर्व रोग्यांस मिळेपर्यंत त्यांनी या तंबूतील एका तंबूंत राहण्याचें साफ नाकारलें.** "

मेसापोटोमियांतील लष्करास फार हाल अपेष्टा भोगाव्या लागतात याबद्दल सर्वतोमुखी झालेल्या व आम्हांस मिळालेल्या हकीकतीस वरील उताऱ्यानें दुजोरा येतो. पण याचवेळीं ज्या हिंदी कारखानदारांनीं ही पडलेली वाण पुरी केली असती त्यांचे कारखाने मालाची सरकारी मागणी नाहीं म्हणून हात बांधून बेकार बसले होते इतकेंच नव्हे तर याहून हृदयाचा भेद करणारी गोष्ट अशी होती कीं, हिंदी कारखानदारांनी तयार केलेले आणि जे मागाहून पास करून घेण्यांत आले असे तंबू मुंबईच्या सरकारी वखारींत कांहीं तरी खुसपट काढून पास न झाल्यामुळें धूळ खात पडले होते. या गोष्टीं जनतेला समजल्या नव्हत्या. हे तंबू योग्य वेळीं पास करण्यांत आले असते तर मेसापोटेमियांत पडलेला तंबूंचा दुष्काळ आपोआप नष्ट झाला असता आणि ज्या उदार अंतःकरणाच्या जनरल मॉडनें आपल्या देशवंधूस दुःखांत टाकून आपण सुखांत राहण्याचें साफ

नाकारलें त्या जनरल मॉडच्या परिस्थितीचें असलें हिडिस चित्रही रेखाटण्याचें कारणच पडलें नसतें. तसेंच आपले जखमी होऊन पडलेले लढवय्ये ज्या तंबूंच्या अभावीं दुःखसागरांत गटंगळ्या खात पडले होते त्याचप्रकारच्या तंबूंचीं पुरवठा करणाऱ्या सरकारी खात्यांतील अधिकारी मुंबईच्या सरकारी वखारींत खेळ खेळत होते ही गोष्टही जनतेच्या हृदयांस टोंचली नसती. या प्रकरणाची विशेष व खुलासेवार चवकशी झाली पाहिजे या विधानास याहून अधिक पुरावा देण्याची जरूरी आहे असें आम्हांस वाटत नाहीं व तो आज आम्ही देतही नाहीं. या प्रकरणीं आणखीही विवेचन आम्हांस करावयाचें आहे पण तें पुढें एखाद्या प्रसंगीं करूं. स्पर्धा करणाऱ्या इंग्रजी कारखानदारांवर सरकारी मागणीचा सारखा वर्षाव होत होता आणि चांगला माल तयार करतात अशी खातरी पटली असतांही हिंदी कारखानदारांस मुद्दाम अपंक्त टाकले होते असें पुढें होणाऱ्या विवेचनावरून स्पष्ट दिसून येईल, परंतु आज आम्हीं एवढेंच सांगून ठेवतों कीं, हिंदी कारखानदारांनीं पुरवठा केलेले तंबू पास करण्यांत चीड येण्यासारखी दिरंगाई केलेली आहे; आणि ही तपासण्याची व पास करण्याची पद्धत फार झालें तर चार दोन दिवस लांबणीवर पडण्यासारखी असतां ती कित्येक महिने लांबणीवर टाकण्यांत आलेली आहे याबद्दल आमच्याजवळ विश्वसनीय असा सबळ पुरावा आहे.

आतां आम्हीं दुसऱ्या मुद्याकडे वळतों. हिंदी कारखानदारांपेक्षां कानपूरच्या गिरणीवाल्यास अधिक दर देण्यांत आला आहे आणि हे दर कानपूर येथील सरकारी तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या शिफारशीवरून वेळोवेळीं थोडथोडे वाढविण्यांत आले आहेत या गोष्टी आतां उघड झाल्या आहेत. या विषयासंबंधानें एका फार मोठ्या अधिकाऱ्यांशीं आमचा पत्रव्यवहार झालेला आहे पण या अधिकाऱ्यानें आपलीं पत्रें 'खाजगी आणि

गुप्त ' हा शेरा देऊन पाठविलेलीं आहेत. पण या दराच्या प्रकरणीं दोन गोष्टी फार महत्वाच्या व आश्चर्यजनक अशा घडलेल्या आहेत यांत संशय नाहीं. पहिली गोष्ट ही कीं कानपूर गिरणीला वाजवीपेक्षां अधिक दर दिल्यामुळें कर भरणारांचें लाखो रुपयांचें नाहक नुकसान झालें आहे आणि दुसरी गोष्ट अशी कीं, लढाई सुरू होईपर्यंत कानपूर गिरणीशीं स्पर्धा करणाऱ्या हिंदी कारखानदारांस ज्या गोष्टींचा अनुभव आलेला होता त्या गोष्टींचा या गिरणीवाल्यास गंधही नव्हतां किंबहुना या कामीं ते अगदींच नवखे होते. पण याहून अत्यंत अचंब्याची गोष्ट ही कीं जे तपासणी करणारे अधिकारी या गिरणीच्या मालाची तपासणी करीत ते लढाई उपस्थित झाल्यावर अगदीं अननुभवी असे निवडण्यांत आले होते आणि ही निवड अनुभवी व निष्णात अशा कामदारांची सरकारी खात्यांत रेलचेल असतां करण्यांत आली होती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अधिक चांगला माल दिला तरच अधिक दर देण्यास सवड सापडते. या संबंधानें आमच्या जवळ जी माहिती ती साग्र दिली असतां जागा बरीच लागणारी आहे तरी पण ती माहिती आम्ही पुन: एखादे वेळीं देऊं. या माहितीवरून तंबूंच्या बाबतींत अशा प्रकारचे अधिक दर देण्यास सवड नव्हती असेंच म्हटलें पाहिजे. हे तंबूचे दर फारच जबरदस्त दिलेले आहेत. तसेंच हे तंबू हिंदी कारखानदार अतिशय कमी दरांत देण्यास तयार असतां हे जबरदस्त दर त्यांच्याशीं स्पर्धा करणाऱ्या इंग्रज कारखानदारांस देण्यांत आले आहेत. कानपूरच्या गिरण्यांत युरोपियन देखरेखीखालीं माल तयार करण्यांत येतो म्हणून इतके महाग दर द्यावे लागले असें एक कारण पुढें करण्यांत येईल. पण चवकशी अंतीं हें कारण खरें ठरेल असें आम्हांस वाटत नाहीं. मोठमोठाल्या हिंदी कारखान्यांत ज्या दर्जाची देखरेख करण्यांत येते त्याहून अधिक प्रतीची देखरेख या गिरण्यांत असेल असें आम्हांस वाटत नाहीं. ' दारुगोळ्याच्या

कारखान्यांत पुरवठा करणारे मक्तेदार मागणी प्रमाणें पुरवठा करूं शकले नाहींत आणि मुंबईचे कारखानदार मालाची योग्य जात किंवा नियमित कालीं तो तयार करून देणें या दोन्हीं बाबतींत गैरभरंवशाचे ठरले आहेत' असेंही कित्येकांचें म्हणणें आहे. यासंबंधानें आह्मी जी चवकशी केली आहे तीवरून हे आरोप खोटे आहेत असेंच आमच्या दृष्टीस पडलें आणि या आरोपांसंबंधानें सरकार उघड उघड चवकशी करील तर त्याचा स्पष्ट खुलासाही करण्यास हे मुंबईचे कारखानदार तयार आहेत. ही चवकशी केव्हां होईल ती होवो पण आमच्या चवकशींत जी एक आश्चर्यकारक गोष्ट बाहेर पडली आहे त्यावरून या आरोपाच्या विरुद्ध दुसऱ्या एका प्रतिआरोपाचा प्रकाश पडलेला आहे. हा प्रतिआरोप असा आहे कीं, कानपूर गिरणीवाल्यांस नमुन्याबरहुकूम माल तयार केला नसतांही पुष्कळ-वेळां गय केलेली आहे. मालाच्या मागण्या होत नाहींत म्हणून मुंबईतील एका कारखानदारानें तंबूचा नमुना मागविला. सरकारी अधिकाऱ्यांनी आखून दिलेल्या नमुन्याप्रमाणें तयार केलेला एक तंबू कानपूर गिरणीवाल्यांनी या मुंबईच्या कारखानदाराकडे पाठविला. हा नमुन्याचा तंबू या कारखानदारां-कडून झकताच परत मागविण्यांत आला आहे. हा तंबू विशेष रितीनें तयार केला होता असें मुळींच नाहीं असें या कारखानदाराचें म्हणणे आहे. तंबू परत मागविते वेळीं 'हा तंबू नमुन्याबरहुकूम तयार केलेला नाहीं' असें मुंबईच्या कारखानदारांस सागण्यांत आहे. पण अशी गोष्ट घडलेली नाहीं असें कारखानदाराचें म्हणणे आहे. या म्हणण्याला कोठेंच लेखी पुरावा नाहीं. पण अशीं व्यंगें प्रथमच दाखविलीं असलीं तर या कारखानदारांनें आपला तंबू तयार करतांना तशा दुरुस्त्या खासच केल्या असत्या हें खरें पण कानपूर गिरणीवाल्यानीं जो तंबू नमुना म्हणून पाठविला त्यांत व्यंगें होतीं असें वरील विधानावरून ठरतें अर्थात मुंबईच्या कारखानदारांच्या उरावर तयार केलेल्या

कानपूर गिरणीवाल्यांनी व्यंगें असलेले तंबू सरकारास दिले आहेत यांत संशय नाहीं. एखाद्या साधारण अकलेच्या माणसास आम्ही असें विचारतों कीं जो माल अधिक चांगला आणि म्हणून सरकार त्यास अधिक दर देते व जो माल नमुना म्हणून मुंबईच्या कारखानदारांकडे पाठविण्यांत येतो त्यांत व्यंगें काय म्हणून व कशीं राहिलीं ! इतर पुरावा बाजूस ठेवला तरी एव्हढी एकच लहानशी गोष्ट सरकारानें पाठीस घातलेल्या गिरणीवाल्यांस अधिक दर देण्यांत केवळ आवडच दाखविली आहे असें स्पष्ट सांगते. मालाची खूप मागणी करावयाची व दर अधिक द्यावयाचा या दोन गोष्टीनीं उदार वर्तन दिसतें खरें पण त्यामुळें कर भरणारांस चांगला चट्टा बसला असें म्हटल्यावाचून भागत नाहीं.

# सरकार आणि सरकारी मक्ते.

नंबर ३.

( ता. ५ दिसेंबर १९१७ च्या क्रॉनिकलवरून. )

लष्करी खात्यासाठीं लागणारे तंबू आणि कातड्याचें सामान यांचे मक्ते देण्यांत सरकारनें बाह्यतः असमर्थनीय दिसणारी रीत अनुसरली आहे त्यासंबंधानें विशेष विस्तृत विवेचन करून वाचकांस तें कंटाळवाणें करण्याची आमची इच्छा नाहीं. या प्रकरणीं चवकशी व्हावी का आमच्या म्हणण्याला पुरतील एवढ्याच गोष्टी आम्ही आपल्या लेखांत ग्रथित करणार आहोंत. परंतु आमच्याजवळ जी माहिती आहे आणि आम्हांपाशीं ज्या कित्येकांनीं लेखी जबाब दिले आहेत त्यांतील महत्वाच्या गोष्टी सांगून आम्हांस त्या प्रश्नावर विशेष उजेड पडेल असें केलेंच पाहिजे. ही गोष्ट आम्ही आमच्या शेवटच्या एक दोन लेखांत करणार आहोंत. ही माहिती देण्यापूर्वी एका गोष्टीबद्दल जनतेला विस्मृती पडतां कामा नये व त्या गोष्टीबद्दल सरकारनें-ही अत्यंत तातडीनें आपल्याजवळ असलेली माहिती लोकांपुढें मांडली पाहिजे. मि. करीमभाईच्या साक्षीची खडानूखडा माहिती सर थामस हॉलंड यांस आगाऊच झालेली होती आणि म्हणूनच ते या साक्षीच्या वेळीं सरकारी फायली बगलेंत मारून सज्ज झाले होते. या फायली या प्रकरणाच्या असाव्यात असा आमचा तर्क आहे. "सरकारी यादींत हिंदी कारखानदारांचीं नांवें आहेत पण त्यांस व त्यांच्याशीं स्पर्धा करणाऱ्या इंग्रजी कारखानदारांस काम दे-ण्याच्या कामीं कसें प्रमाण आहे" असा मार्मिक प्रश्न मि.करीमभाई यांजकडून होतांच सर साहेबांनीं फायली उघडल्याच नाहींत मग आंतील लेख त्यांनीं

वांचले नाहींत हें सांगावयास नकोच. ज्या हिंदी कारखानदारांस मान्यता देऊन सरकारानें आपल्या यादींत त्यांची नोंद केली होती त्या यादींत मि. करीमभाई यांनीं विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर नसावें असें यावरून होतें. मि. करीमभाईच्या प्रश्नाचें उत्तर त्यांत नसेल किंवा मि. करीमभाईनीं गुप्त तऱ्हेनें साक्ष देण्याचें नाकारल्यामुळें सर साहेबांनीं त्या प्रकरणीं आणखी माहिती देऊन आपणास गुरफटून न घेण्यांत शहाणपणा केला असेल. तें कांहीं असो, पण जे आंकडे सरकारानें सर थामस यांस दिले नाहींत ते आंकडे जनतेपुढें आलेच पाहिजेत. या आंकड्यांवरून मि. करीमभाई म्हणतात त्याप्रमाणें हिंदी कारखानदारांस बळी देऊन युरोपियन कारखानदारांची पिशवी भरण्यांत आली असेल तर मि. करीमभाइ यांचे आरोप कितपत खरे आहेत हें अजमावून पाहाण्यासाठीं आणि विशेषतः मागणीची संख्या किती आहे हें समजण्यासाठीं तरी निदान ही माहिती सरकारानें प्रसिद्ध केली पाहिजे. यासंबंधानें आरोप पुराव्याला धरून नाहींत आणि सरकारनें दिलेल्या यादीवरून ते आरोप असमर्थनीय आहेत अशी सर थॉमस यांची समजूत झालेली दिसते, तर ते आंकडे दिले असतां मि. करीमभाई म्हणतात त्याप्रमाणें जें काय सत्य असेल तें आपोआपच बाहेर पडणार आहे.

या प्रकरणीं सार्वजनिक पैशाची जी धुळधाण उडविण्यांत आली आहे यासंबंधानें आम्ही आतां विचार करणार आहोंत. लढाई सुरू होण्यापूर्वीं तंबू विकत घेण्याच्या कामीं सरकारी निरखापेक्षां जास्त दर देण्यांत आलेले आहेत आणि हे दर त्यावेळीं व अजूनही फक्त कानपूर गिरणीवाल्यांसच देण्यांत आलेले आहेत. हा जास्त दर देण्याच्या प्रश्नाचा विचार करतानाही कानपूर गिरणी या तंबूंच्या कामीं अगदीं नवी व अननुभवी होती ही गोष्ट लक्षांत ठेवणें फार महत्वाचें आहे; तसेंच हा माल तपासून घेण्यासाठीं ज्या इन्स्पेक्टरांस सदोदित डांबून ठेवण्यांत आला होता तोही या कामीं नवखाच

होता. सरकारानें आखून दिलेल्या प्रकारचे तंबू या गिरणींतून मिळाले नाहींत आणि देण्यांत आलेले तंबू पुष्कळ व्यंगांनीं भरलेले होते या गोष्टी अगदीं स्पष्ट आहेत. या संबंधानें आणखीही एक मौजेची पण विशेष लक्षांत ठेवण्याची गोष्ट घडलेली आहे. कानपूरच्या गिरणीवाल्यांस वेळोंवेळीं ज्या अधिकाधिक मागण्यांचे हुकूम मिळाले आहेत ते याच अननुभवी कामदाराच्या शिफारशीवरून मिळालेले आहेत. हा कामदार एखादें काम करून घेणारा जबाबदार कामदार नव्हता तर फक्त इन्स्पेक्टर म्हणजे मालाची तपासणीं करणारा होता अर्थात यांस अधिक मागणी करण्याची व दरांत फेरफार करण्याची शिफारस करण्याचा अधिकारच नव्हता किंवा त्याचें कर्तव्यही नव्हतें. ज्या कोणास माल तपासून घ्यावयाचा असतो आणि दिलेला माल योग्य आहे असें ठरवावयाचें असतें त्याच्या हातीं अधिक मागणी करण्याची जबाबदारीची गोष्ट असणें केव्हांही अयोग्यच ठरेल. या सर्व गोष्टी लक्षांत ठेऊन प्रत्येक तंबूबद्दल जी किंमत पूर्वी देण्यांत येत होती व जी आज सुद्धां हिंदी कारखानदारांस देण्यांत येत आहे त्याहून ७० किंवा ८० रुपये जास्त किंमत कानपूर गिरणीवाल्यास देण्यांत आलेली आहे. ही अधीक देण्यांत आलेली किंमत अंशतः युरोपियन देखरेखीमुळें आलेली आहे असें अधिकाऱ्यांचें म्हणणें आहे. या म्हणण्याचा काय अर्थ होतो हें वाचकानींच समजावें. फक्त उदाहरण घेऊनच या गोष्टीचा विचार केल्यास असें दिसून येतें कीं दहा हजार तंबूंची मागणी केली असतां–या मागण्या इतक्या आकड्यानेंच पुऱ्या झालेल्या नाहींत–आणि अधिक किंमत ७० रुपयेच धरली तर कर भरणाऱ्या रयतेच्या डोक्यावर ७० लाखाचा बोजा लादण्यांत आलेला आहे. पण एवढ्यानेंच हें प्रकरण आटोपत नाहीं. आम्हांस अशी अत्यंत विश्वसनीय माहिती मिळाली आहे कीं मेसर्स अदमजी पीरभाई आणि इतर सरकारी मक्तेदार यांस नमुन्याप्रमाणें ठरलेल्या किंमतीतच

तंबूस लागणारें किरकोळ सामान म्हणजे काठ्या, खुंट्या, म्यालेट वगैरे देण्यासाठीं सरकारानें बांधून घेतलेलें आहे पण कानपूर गिरणीवाल्यांस शेवटीं सांगितलेल्या दोन जिनसाशिवाय ह्मणजे खुंट्या म्यालेटशिवाय तंबूंचा पुरवठा करण्याची मुभा मिळालेली आहे आणि या वस्तूंचा दर त्या गिरणीस अधिक देण्यांत आला आहे. या वस्तु तयार करण्यास साधारणपणें दर तंबूमागें १० रुपये खर्च येतो तेव्हां दहा हजार तंबूंच्या मागणीबरोबर आणखी एक लाखाचा बोजा कर भरणाऱ्यांच्या शिरावर पडला असें होतें. कर भरणाऱ्या रयतेच्या डोक्यावर हा जो जास्त बोजा पडला तो अंशतः ' युरोंपियन देखरेखी ' मुळें पडला पण बाकीचा अंश कोणीकडे गेला हें एक परमेश्वर जाणे. ' मुंबईचे कारखानदार माल वेळेवर देत नाहींत व त्यांच्या मालाचा मगदूरही चांगला नसतो ' असा एक आरोप करण्यांत आलेला आहे पण हा आरोप पूर्णपणें खोटा आहे असें शाबीत करण्यास हे कारखानदार तयार आहेत हीही गोष्ट यावेळीं लक्षांत ठेविली पाहिजे. कानपूर गिरणीवाले तरी मालाच्या दर्जासंबंधानें विश्वास पात्र ? कसे ठरले ? आमच्या माहिती देणारानें या कानपुरी तंबूत कोणकोणत्या न्यून गोष्टी आहेत याची एक लांबलचक यादी दिली आहे. हे अवगुण त्या सरकारच्या आवडत्या कारखानदारानें तयार केलेल्या तंबूत आहेत असा याचा आरोप आहे आणि मेंसर्स आदमजी पीरभाई तर या संबंधानें उघड चवकशी व्हावी असें आव्हान करीत आहेत, व असें स्पष्ट बोलून दाखवीत आहेत कीं आदमजी परिभाईच्या कारखान्यांत तयार झालेले तंबू या कानपुरी तंबूपेक्षां शेकडा ५० या प्रमाणांत जास्त चांगले आहेत. पण याबद्दल आम्ही विशेष गवगवा करण्यास तयार नाहीं.

आम्ही काल लिहिल्या प्रमाणें सिमल्याच्या अधिकाऱ्यांनी नमुना म्हणून जो कानपुरी तंबू सरकारला काय व कसे तंबू पाहिजेत हें दाखविण्यासाठीं

मुंबईच्या कारखानदाराकडे पाठविला तो नमुन्यावरहुकूम नव्हता इतकेंच नव्हे तर शिवाय त्यांत कांहीं वैगुण्यें होतीं एवढी कबूलीच आम्हास पुरीशी वाटते. हा-तंबू मुंईबच्या कारखानदारांकडे नमुना म्हणून पाठविण्यांत आलेला तंबू अतीशय उत्तमच असला पाहिजे अशी कल्पना करण्यास काय हरकत आहे ? हा नमुना पाठवितांना भोपळ्या एवढी चूक झाली असेल तर मात्र कांहीं सांगवत नाहीं ! सरकारी नमुन्या प्रमाणें जो माल तयार झाला नाहीं त्यास सरकारी ठरलेल्या निरखापेक्षां जास्त किंमत देण्यांत येते हें काय गौडबंगाल असावें बरें ? हा ज्यास्त पैसा कर भरणाऱ्या रयतेच्या खिशांतून बाहेर पडला आणि लष्करी खात्यास कमी दर्जाचा माल देणाऱ्या कारखानदारास मिळाला !

आतां आह्मी खुद्द लष्करी खात्यासच एक स्पष्ट प्रश्न विचारतों. लष्करी खात्यास पुरविलें जाणारें सामान योग्य प्रकारचें आहे असें ठरविणारांकडून जर कानपूर गिरणीतील मुद्दाम निवड केलेला अशा प्रकारचा तंबू पसंत करण्यांत येतो व तो कमी दर्जाचा सांपडतो तर तो कोणाच्या हुकमानें स्वीकारण्यांत येतो ? माल कसा असावा हें कमांडर इन्‌चीफ यांणी ठरविलें असलें पाहिजे असें आम्हांस वाटतें; तेव्हां तशा प्रकारें ठरविलेल्या नमुन्यांत कमी अधिक करणें त्यांच्या हुकुमावाचून होता कामा नये. या प्रकरणांत अशा प्रकारचा हुकूम मिळविला गेला आहे काय ? जर नसेल तर हा कमीपणा कोणाच्या अधिकारानें होऊं दिला ? अशा रितीने कमांडर इन् चीफ यांचा अधिकार कोणी लुबाडून घेतला ? यासंबंधानें कमांडर साहेब किंवा दारूगोळा बोर्डाचे अधिकारी तपास करतील काय ? तसेंच औद्योगिक कमिशन-पुढें मि. करीमभाई यांणीं जे आरोप केले आहेत त्याबद्दलही सदर सद्‌गृहस्थ विचार करतील काय ? सर थॉमस हॉलंड कसाही विचार करोत पण या प्रकरणाच्या एकतर्फी चवकशीनें जनतेची चालढकल होता कामा नये हें

अगदीं उघड आहे. या प्रकरणाची उघड चवकशी करून केले गेलेल्या गंभीर आरोपांबद्दल समर्थन कशा प्रकारचें आहे व तें समर्थन कबूल होण्यासारखें आहे अशी खात्री पटविण्याचें कर्तव्य कमांडर इन्‌चीफ यांचें व दारूगोळा बोर्डाचें आहे असें आम्ही स्पष्ट म्हणतों. दारूगोळा बोर्डांत अनुभवी मेंबर नाहींत ही दुःखाची गोष्ट आहे. तसेंच केलें जाणारें समर्थन योग्य नाहीं असें आढळून आल्यास आणि खरोखरच अधिकाराचा दुरुपयोग झाला असेल तर तो ज्यांनी केला असेल त्यांचा जाब घेतला पाहिजे हेंही आम्ही याचवेळ सांगून ठेवतों.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# सरकार आणि सरकारी मक्ते.

नंबर ४.

( तारीख ७ दिसेंबर १९१७ च्या क्रॉनिकलवरून. )

युरोपियन कारखानदारांस मालाचे मोठमोठे मक्ते देऊन सरकारानें एकपक्षीयपणा दाखविला असें औद्योगिक कमिशन पुढें मि. करीमभाई यांणी स्पष्ट विधान करून गंभीर आरोप केले आहेत आणि याच प्रकरणासंबंधानें आम्ही आजपर्यंत लिहिलेले लेख आहेत या सर्व गोष्टी लक्षांत घेतां हिंदुस्थान सरकार यासंबंधानें उघड चवकशी करण्यास काकूं करील असें आम्हांस वाटत लाहीं. उघड चवकशी करणें हा एकच मार्ग लोकांचा विश्वास बसण्यास मोकळा आहे. अशा प्रकारें उघड चवकशी केली असतां सरकारानें या प्रकरणीं एकपक्षीपणा दाखविला असें जें स्पष्ट व घातुक विधान करण्यांत आलें आहे आणि त्यामुळें रयतेच्या पैशाची उधळपट्टी झाली आहे. तें एक तर खोटें आहे असें जनतेच्या दृष्टीस पडेल किंवा तो एकपक्षिपणा होता असें शाबीत होऊन तो यापुढें एकदम बंद करण्यांत येईल आणि अशा प्रकारें अधिकाराचा गैर उपयोग केल्यामुळें रणांगणावरील शिपायांस आणि रयतेस जो भुरदंड भरावा लागला तो तरी यापुढें भरावा लागणार नाहीं. या प्रकरणांत गुरभटलेल्या कामगारांचें वकील पत्रच जणूं घेऊन सर थामस हालंड यांणी आपली जी चीड येणारी वर्तणूक दाखविली आणि या वर्तणुकीवरून हें सर्व प्रकरण आंतल्या आंत दाबून टाकण्याचा सरकारी अधिकाऱ्यांचा प्रयत्न आहे अशी जी रयतेची बलवत्तर समजूत

होण्याचा संभव आहे तो संभव दूर करण्यास उघड चवकशी हा एकच मार्ग सरकारास मोकळा आहे. अशा प्रकारें उघड चवकशी करणें अत्यंत जरूरीचें आहे हें सिद्ध करून देण्यास लागणारा पुरावा आम्हीं पूर्णपणें पुढें मांडला आहे असें आम्हांस वाटतें. तरी आमचें म्हणणें सरकारी अधिकाऱ्यांच्या पूर्णपणें गळीं उतरावें म्हणून आम्ही उघड चवकशी करण्यासाठीं नेमल्या जाणाऱ्या सद्गृहस्थांस आमचें तें म्हणणें मार्ग दर्शक व्हावें म्हणून त्याचा थोडक्यांत गोषवारा देऊन आम्ही हें प्रकरण आज समाप्त करणार आहोंत. आमच्या या लेखांत या प्रकरणाचा सर्व साधारण इतिहास आणि त्या प्रकरणाचे मुख्य मुख्य मुद्दे देण्याचें आम्हीं ठरविलें आहे. हें करण्यापूर्वी लष्करी खात्यास माल पुरविण्याच्या कामीं योग्य दावाची हयगय, देखरेख ठेवण्यासंबंधाची हेळसांड आणि नासधूस व उधळपट्टी या गोष्टी पुष्कळ मार्गांनीं घडून येत आहेत असें या प्रकरणाची उत्तम माहिती असणाऱ्या पुष्कळ लोकांस वाटत आहे हीही एक पुरवणी सर्व साधारण आरोपांस जोडण्यांत येत आहे. आम्हांस जी माहिती आहे त्यावरून मेसर्स अदमजी पीरभाई आणि पुत्र या नांवाच्या कारखानदारांनीं तंबूच्या खुंट्या प्रत्येकीं दीड आणा या दरानें सरकारास पूर्वी दिलेल्या आहेत व अजूनही ते कारखानदार त्याच दरानें त्या देण्यास तयार आहेत. पण यासंबंधानें असा आरोप आहे कीं, पूर्वीच्या खुंट्यापेक्षां कमी दर्जाच्या खुंट्या कसींतकसी तिप्पट किंमत देऊन रेल्वे व इतर कारखानदारांकडून दारूगोळा बोर्ड घेतें. अशा प्रकारच्या खुंट्यांनीं भरलेले रेल्वेचे मालाचे डबे कांहीं दिवसांपूर्वी मुंबईच्या वखारींत आलेले आहेत. या खुंट्या अजूनही वखारींत असाव्यात असें वाटतें तरी यावेळीं एका किंवा अधिक अशा तज्ज्ञांस यांची निःपक्षपातानें परीक्षा करण्यास सांगावें अशी आमची सूचना आहे. अशी परीक्षा झाली म्हणजे सरकारच्या तपसणी खात्यांत अननुभवी माणसें आहेत या आरोपाचीही चांगली चाचणी होण्याचा संभव आहे.

मुख्य प्रश्नाचा थोडक्यांत गोषवार. लढाई सुरू होण्यापूर्वी आर्डनन्स खात्याच्या अर्सेनल भागाकडूनच लष्करी खात्यास लागणारे तंबू विकत घेण्यांत येत असत. ही वहिवाट सुमारें अर्ध शतक चालू होती आणि आज जे तंबू नमुने म्हणून तयार झाले आहेत ते या काळांतील अनुभवावरूनच ठरविण्यांत आलेले आहेत अर्थात ते पूर्णपणें जसे असावेत तसे आहेत असें मानण्यास हरकत नाहीं. हे नमुने कमांडर इन्चीफ यांणी पसंत केले आहेत हें आम्ही पूर्वी सांगितलेंच आहे तेव्हां या नमुन्याशिवाय अन्य तऱ्हेने नमुने पसंत करण्यास सम्मत्ती देण्याचा कोणासही अधिकार नाहीं. लढाई सुरू झाल्यानंतर तिच्या पूर्व कालांत अर्सेनल खातें हिंदी कारखानदारांकडून दर तंबूस ३६२ रुपयांपासून ३८२ रुपयापर्यंत किंमत देऊन विकत घेत असें. त्या काळापर्यंत कानपूरच्या गिरणीवाल्यांनीं आर्डनन्स खात्याला तंबूचा कधींही पुरवटा केलेला नाहीं असें समजतें. परंतु लढाई सुरू झाल्यानंतर या गिरणीवाल्यास या मालाची फार मोठी मागणी देण्यांत आली. या मागण्या उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणावर जाऊं लागल्या अर्थात हिंदी कारखानदारांकडे केल्या जाणाऱ्या मागण्या त्या मानानें आखडत्या होऊं लागल्या, व शेवटी त्या शून्यावर आल्या. वाढत्या मागणीबरोबरच दरही वाढत चालले. हे वाढलेले दर अंशतः युरोपियन देखरेखीमुळें वाढले असें सांगण्यांत येतें पण त्या वाढत्या दरांतील बाकीचा अंश कोठें गेला हें अजून अंधारांतच आहे. कानपूर गिरणीस दिले जाणारे दर एकदाच वाढले नसून दोन तीनदां वाढले आहेत आणि आज त्यांचा दर ४७५ रुपये आहे मात्र हाच दर हिंदी कारखानदारांस न मिळतां त्यांच्या पदरी ४०५ रुपये पडतात. हिंदीकारखानदार फक्त मुंबईतच नाहींत तर ते रावळपिंडी, फेरोझपूर, दिल्ली, आग्रा आणि अलाहाबाद येथेंही आहेत. या सर्व हिंदीकारखानदारांस अर्सेनल खात्याशींच व्यवहार करावा लागतो आणि त्या खात्याच्या अधिकाऱ्यांनी या

हिंदी कारखानदारांस मक्त्यांतील अटींनीं गच्च आवळून घेतलेले आहेत. या अधिकाऱ्यांचें हें करणें अगदीं बरोबर आहे आणि कानपूरच्या गिरणीस अधिक दर मिळतो ही कुरकूर बाजूला ठेवल्यास या हिंदीकारखानदारांची या कामीं कोणत्याही प्रकारची तक्रार नाहीं. कानपूरचे माल पुरवठा करणारे गिरणीवाले अर्सेनल खात्यांतील अनुभवी कामदारांशीं व्यवहार करीत नाहींत तर आज तागायत त्यांच्यावर एक निराळाच तपासणी कामदार नेमलेला आहे व हा अधिकारी या जागेवर येईपर्यंत या कामांत पूर्ण अननुभवी होता असें सरकारी तऱ्हेनेंच बाहेर आलें आहे. ' कानपूर मिलचा माल मेसापोटेमियांत गेल्यावर तेथून त्या मालाबद्दल तक्रारी आल्याचा दाखला सांपडत नाहीं, अर्थांत हा तपासणी कामदार जरी अननुभवी असला तरी ज्या अर्थीं तक्रार नाहीं त्या अर्थीं तो या कामीं वाकबगारच आहे असें मानण्यास काय हरकत आहे ? ' असें सरकारी तऱ्हेनें आह्मांस बजावण्यांत आलें आहे. ' मेसापोटेमियांत पाठविलेल्या मालाच्या तक्रारीचा मागमूस सांपडत नाहीं, ' ही शब्द योजना संशयांत पाडणारी आहे पण हा प्रश्नच सोडून दिला तरी या गिरणीमार्फत जे तंबू पुरविले जातात त्यांत पुष्कळ चुका असतात व ते नमुन्याप्रमाणें नसतात असें पुष्कळ वेळां सरकारास कळविण्यांत आलें आहे हें आम्हांस माहीत आहे. कानपूर गिरणीतून जो तंबू मुद्दाम नमुना म्हणून हिंदी कारखानदारांकडे पाठविण्यांत आला होता तो सरकारी नमुन्याप्रमाणें नाहीं व त्यांत नानातऱ्हेच्या चुका आहेत असें आढळून आलें आणि याच मुद्यावर बऱ्याच महिन्यांनीं हा तंबू परत करण्याविषयीं त्या कारखानदारास सरकारी तऱ्हेनें कळविण्यांत आलें होतें हीही गोष्ट सरकारतर्फे कबूल करण्यांत आली आहे. तेव्हां कानपूर गिरणीवाल्यास थोड्याच मुदतींत पुष्कळ मालाची अधिक दरानें मागणी केल्यामुळें २५-३० लाख रुपये जास्त मिळाले एवढेंच सिद्ध होत नाहीं तर, सरकारी नमुन्यावरूनच पहातां त्या

गिरणीवाल्यास सरकारी नमुन्यापेक्षां कमी दर्जाचा माल देण्याची परवानगी देण्यांत आली होती असेंही सिद्ध होतें. या सर्व घडलेल्या प्रकारास स्पष्टीकरण असेल तर तें फारच चमत्कारिक असलें पाहिजे. पण स्पष्टीकरण नसेल तर लढाई सुरू होण्यापूर्वी ज्या माणसास या कामाची मुळींच माहिती नव्हती अशा माणसास लढाई सुरू होतांच तपासणीच्या अधिकारावर नेमल्यामुळें हा सर्व प्रकार घडून आला अशीच निरुपायानें समजूत करून घेतली पाहिजे. अननुभवी माणसाची नेमणूक झाल्यामुळें जो परिणाम घडला त्याबद्दल तो अननुभवी माणूस जबाबदार नाही तर ज्यानें त्याची नेमणूक केली तोच जबाबदार धरला पाहिजे. हा जबाबदार गृहस्थ कोण ? हेंच जाणण्याची आमची इच्छा आहे. पूर्वींची सर्व वहिवाट व नियम धाब्यावर बसवून या अननुभवी तपासणी कामदारास ज्या मालाची तपासणी करावयाची त्या मालाचा दर वाढविण्याची शिफारस प्रथम लष्करी अधिकाऱ्यांस व नंतर दारूगोळा बोर्डास करण्याचा काय अधिकार होता, हेंही आम्हांस समजलें पाहिजे.

कानपूर गिरणीवाल्यास मालाची मागणी विशेष आणि दरही वाढलेले व त्यासंबंधाच्या चमत्कारिक गोष्टी याबद्दल विवेचन केलें. पण दुसरीकडे हें चित्र कसें दिसेल तें पहा. हें चित्र हिंदी कारखानदारांचें आहे. हे बिचारे अनुभवानें पूर्ण वाकबगार झाले असतां मागणी मिळावी म्हणून धापा टाकीत आहेत. "आम्हीं आमच्याशीं स्पर्धा करणाऱ्या युरोपियन कारखानदारांनी तयार केलेल्या मालापेक्षां दीडपटीनें चांगला माल तयार करून देण्यास तयार आहोत व असा माल युरोपियन कारखानदारापेक्षां कमी दर घेऊन तयार करून देतो "असें ते कारखानदार स्पष्ट आव्हान करीत आहेत. अशा हिंदी कारखानदारांस वेळोवेळी पेज पाजण्यांत येत आहे.(अत्यंत थोड्या मागण्या देण्यांत येतात )व त्यांनी तयार केलेले तंबू—मागाहून ज्या अर्थी पसंत झाले आहेत त्या अर्थीं चांगल्या स्थितींत

असलेले तंबू–पसंतीच्या अभावीं वखारींत धूळ खात पडले होते. अशा धूळखात पडलेल्या वेळींच मेसापोटामियांतील शूर सेनानी इतर जखमी आणि आजारी देशबांधवांस तसा आराम मिळत नाहीं म्हणून चांगला तंबू घेण्याचें नाकारीत आहेत. याच सुमारांस कांहीं तासांत कानपूरच्या गिरणीवाल्यास माल पुरविण्याविण्याची भरभकम आरडर ( मागणी ) देण्यांत येते. याच परिस्थितीशीं सरकारास तोंड द्यावयाचें आहे व ती परिस्थिती फार गंभीर आहे. यावेळीं दोन गोष्टी होणें अत्यंत जरूरीचें आहे असें आम्हांस वाटतें.

( १ ) ज्यांस मागणी पुरी करता येईल अशा सर्वांस निःपक्षपात बुद्धीनें मागणीची वाटणी करण्यांत यावी; मालाचा दर सर्वांस सारखाच असावा आणि दराचा प्रश्न निर्विकार बुद्धीनें सोडविण्यांत यावा आणि तपासणी कामदाराची निवडणूक अर्सेनल खात्यांतील अनुभवी माणसांपैकींच व्हावी.

( २ ) अधिकाराचा दुरुपयोग केल्याबद्दल जे आरोप करण्यांत आले आहेत त्यांची उघड चवकशी व्हावी व ती पूर्णपणें करण्यांत यावी व निःपक्षपातीपणाबद्दल आणि योग्यतेबद्दल जनतेचा ज्यांच्यावर विश्वास असेल त्यांच्या मार्फतच ही चवकशी व्हावी.

---

# मि. के. ए. पीरभाई यांचा लेखी जबाब.

## ( औद्योगिक कमिशनपुढें झालेला. )

सरकारी मक्ते देण्यांत आक्षेपित लाडकेपणा या संबंधानें मि. कीकाभाई अदमजी पीरभाई यांचा औद्योगिक कमिशनपुढें जो लेखी जबाब झाला तो येणेंप्रमाणें:—

## तंबूंचे मक्ते.

१ माथेरान स्टीम रेल्वे, अदमजी पीरभाई स्पिनींग, व्हीवींग आणि म्यान्यूफाक्चरिंग मिल, धी वेस्टर्न इंडिया आर्मी बूट एन्ड इक्विपमेंट फ्याक्टरी आणि अदमजी पीरभाई टेंट फ्याक्टरी या कारखान्यांचे मालक सर आदमजी पीरभाई आणि सन्स या फर्मचा मी मुखत्यार आहे. आमची फर्म १८६५ त स्थापन झाली आणि तेव्हांपासून हिंदी लष्करास लागणारे तंबू व चामड्याचें सामान जवळ जवळ निम्मे आम्ही पुरवठा करीत आहोंत. आम्हीं या करितां मुंबईस एक मोठा कारखाना सुरू केला आहे. व त्यांत हजारों कामगार काम करीत आहेत. आमचा माल सरकारास नेहमी पसंत पडतो; परंतु चालू लढाई सुरू झाली तेव्हां साधारणत: आमच्याशीं स्पर्धा करणाऱ्या युरोपियन कारखानदारांस माल पुरवठा करण्याच्या आर्डरी द्याव्या असा सरकारचा कल झाला असें मोठ्या दु:खानें म्हणावें लागतें. जो कारखाना स्थापन होऊन आज जवळ जवळ अर्ध शतक झालें आहे त्या कारखान्यांतून तयार होणाऱ्या मालासंबंधानें मला जी विशेष माहिती आहे ती ध्यानीं आणून या सरकारी कलासंबंधानेंच मी आपले विचार या लेखांत गोवले आहेत. या लेखी जबाबांत मी जें काय लिहिलें आहे तें गुप्त प्रकारचें आहे असें मुळींच समजण्यांत येऊं नयें. अशी माझी इच्छा आहे. ज्या गोष्टी गुप्त अशा मानल्या जातात त्या कमिशनपुढें मांडण्याचा माझा इरादा नाहीं. या कारखान्यांत तयार होणाऱ्या चामड्याच्या मालाबद्दल मी आपला लेखी जबाब दिलाच आहे. हा जबाब गिरणीच्या कारखान्यांतून जे तंबू तयार करण्यांत येतात त्यांसंबंधाचा आहे; आणि या जबाबांत मी ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या हिंदी औद्योगिक धंद्यांची जोपासना आणि वृद्धि होण्यास फार महत्वाच्या आहेत असें माझें मत आहे.

२ आम्ही इ.पी.प्रायव्हेट तंबू किरकोळ भावाच्या दरानें म्हणजे प्रत्येकीं ३७८ रुपयांस पुरवठा करतो. आमच्या सारखेच इतर हिंदी कारखानदार असेच तंबू शेंकडा २० जास्त अशा या भावानें पुरवठा करतात आणि कानपूर गिरणीवाले दर नगास ४०० रुपया प्रमाणें पुरवठा करतात. इ. स. १९१६ त आमचा पुरवठा कमी करण्यांत आला असें जेव्हां कानपूरच्या गिरणीवाल्यांस समजलें तेव्हां त्यांनीं आपले दर वाढविण्यास सुरुवात केली. आज त्या गिरणीवाल्याकडून दर नगास ४८५ रुपये या भावानें तंबू पुरविले जातात. याच सुमारास कापूस आणि रंग फार महाग झाल्यामुळें आमचा दर ४०० रुपये करावा अशी आम्ही सरकारास विनंति केली व ती इ. स. १९१७ च्या जानेवारींत मान्यही करण्यांत आली; पण दुर्दैवाने तेव्हांपासून आतां पर्यंत फक्त ३०० तंबूंचीच मागणी करण्यांत आली आहे. हिंदुस्थानांत अंधुक तांबडे व तांबडे तंबू फक्त आमच्याच कारखान्यांत होऊन पुरविले जात होते हेंही आम्ही येथें नमूद करतो.

३ कानपूरच्या गिरणींत तयार होणारे तंबू आम्हांस मुंबईस पहाण्यास मिळाल्यावरून हें तंबू आमच्या तंबूंपेक्षां कमी योग्यतेचे आहेत व ते तयार करण्यास लावलेला माल मसाला कमी दर्जाचा आहे ही गोष्ट आॅर्डिनन्स खात्याच्या वखारीच्या कामदारांस आम्ही पुष्कळ वेळां तारेनें कळविली आहे. परंतु या संबंधानें कांहींच विचार करण्यांत आलेला नाहीं. आम्हांस योग्य दिशेचें ज्ञान व्हावें म्हणून कानपूर मिलमधून तयार होणाऱ्या उत्तम तंबूंपैकीं कांहीं तंबू नमुना म्हणून विकत द्या असेंही आम्ही त्यांस विचारलें होतें पण हीही विनंति नाकारण्यांत आली नाहीं.

४ जोपर्यंत मुंबईच्या वखारी खात्यांत आॅर्सिनल अधिकारी माल तपासणार होते तोंपर्यंत आम्ही लाखो रुपयांचा लष्करी मालाचा पुरवठा केलेला आहे. पण अलीकडे ब्रम्हदेशांत एका खाजगी लाकडाच्या कारखान्यांत काम केलेला,

रिझर्व्ह लष्करी ऑफिसर या दर्जांचा, लष्करी तंबू आणि इतर लाकडी सामान यांची परीक्षा करण्यांत बेवाकबगार अशा एका ए. आय. जी. एस. माणसास माल तपासून पसंत करण्याचा स्वतंत्र अधिकार देण्यांत आला आहे. हा अधिकार हिंदुस्थान किंवा बाह्य प्रदेशांतून पुरवठा केला जाणाऱ्या सर्व मालावर दिल्यापासून आमचा पुरवठा या गृहस्थांनी संपुष्टांत आणला आहे. ज्यांच्या तपासणीविरुद्ध आमची तक्रार आहे त्याहून भिन्न असे अर्सेनल खात्यांतील अनुभवी कामगार आमच्या मालाची परीक्षा करण्यासाठीं पाठविण्यांत आलेले नाहींत अशी आम्ही पुष्कळ वेळां तक्रार केली आहे. असें करण्यांत कानपूर गिरणीला प्रोत्साहन देण्याचा हेतू आहे. आम्ही असें स्पष्ट म्हणतो याचें कारण हें कीं, इतर गिरणीवाल्यांस किंवा त्यांच्या मक्तेदारांस तंबू पुरविले असतां ते लोक सुतळ, दोरखंड किंवा कपडा याबद्दल कोणत्याही प्रकारची तक्रार करीत नाहींत पण असेंच सामान लावून तयार केलेले तंबू मुंबईच्या ए. आय. जी. एस. कामगाराकडे पसंतीकरतां पाठविले असतां याच माला संबंधानें कांहीं निराळेच दोष दाखविण्यांत येऊन ते तंबू पसंत केले जात नाहींत. गेल्या ५२ वर्षांत कमींतकमी ५० अनुभवी कामदारांनी आमच्या मालाची अतिशय उत्तम प्रकारची शिफारस केलेली आहे. परंतु आलीकडे या तपासणीच्या कामावर अननुभवी माणसांची नेमणूक करण्यांत आली आहे आणि यानी दिलेलें मत अधिकाऱ्यांकडून जणू ब्रम्ह वाक्यच समजलें जातें. दक्षिण आफ्रिका आणि इतर मोहिमांच्या वेळीं आम्ही लष्करासाठीं शेकडो तंबू पुरविले आहेत व ते त्यावेळीं त्या खात्यास उत्तम रितीनें पसंतही पडलेले आहेत आणि आम्ही बजावलेल्या चाकरीबद्दल आर्डेनन्स खात्याचे त्यावेळचे डायरेक्टर जनरल सेनाधिपती वेस याणी वाहवा केलेली आहे आणि असेंही म्हटलें आहे कीं, आमच्या मदतीशिवाय लष्करी खात्यास इतके चांगले तंबू खासच मिळाले नसते.

# सरकारास बसलेला चट्टा.

इतर हिंदी मक्तेदार आमच्यापासून कपडा, सुतळ आणि दोरखंड विकत घेऊन निरनिराळ्या अर्सेनल खात्यांस प्रत्येकीं ४०० रुपये दर घेऊन तंबू विकीत आहेत. पण या मक्तेदारांनीं जास्त मालाची मागणी करा अशी विनंति केल्यास ती तत्काळ नाकारण्यांत येते. पण कानपूरच्या गिरणीवाल्यास अधिक दर देऊन मागणीची रेळचेळ उडवून दिली आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, सरकार दर तंबूंच्या मागें ८५ रुपये जास्त देते. शिवाय ते तंबू मुंबईस आणणावळ १० रुपये पडते. मग ते तंबू रेल्वेवर चढविणें व उतरून घेणें हा किरकोळ खर्च वेगळाच. कानपूर मिलला ४०० रुपयांचा पूर्वीचा दर होता तो ४८५ करून देण्यास कानपूर येथील जनरल स्टोर्सचे इन्पेक्टर यांणी शिफारस केलेली आहे. अशा प्रकारची मागणी सदर कामदारास मान्य करतां येत नाहीं. अशी सर्व साधारण समजूत आहे. सदर कामदार तपासणी कामदार असून बजावणी करणारा कामदार नव्हे. एक अपवाद शिवाय करून ज्या दरानें हिंदी कारखानदार तंबू देण्यास तयार होते त्यांच्या डोळ्यांदेखत कानपूर मिलवाल्यास अधिक दराची मागणी करण्यांत आली. इ. स. १९१४ च्या दरापेक्षां १२० रुपयांनीं जास्त अशा दराची मागणी कानपूर गिरणीनें इ. स. १९१७ च्या आगष्टांत केली. ही मागणी मान्य करण्यांत यावी अशी शिफारस तपासणी कामदारानें केल्यावर ती मागणी मान्यतेसाठीं म्यूनिशन बोर्डकडे गेली. हें बोर्ड नुकतेंच स्थापन झालें होतें व त्यानें ही मागणी मान्य केली नाहीं हे आश्चर्यच ह्मणावयाचे. कारभार कसा चालला आहे हें समजावें म्हणून हें एक उदाहरण दिलें आहे. यानंतर कांहीं दिवसांनी

कानपूर गिरणीनें केलेली दराची वाढती मागणी ३० रुपयांनी कमी केली म्हणजे इ. पी. खाजगी तंबू ३८५ रुपयांस देण्याचें कबूल केलें. हाही दर बेसुमार वाढता खरा पण तोही कबूल करण्यांत आला. हा वाढता दरही अननुभवी अशा तपासणी कामदाराच्या शिफारशीवरुन कबूल करण्यांत आला हें उघड आहे.

याशिवाय आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्या सारखी आहे. अनिलाईन रंगाचें कापड फक्त आह्मीच तयार करतों अर्थात कानपूर गिरणीकडून जे तंबू पुरविले जातात त्यांस या रंगाचें कापड नसतें. आम्ही जे तंबू पुरवितों त्यांस तांबड्या अनिलाईन रंगाचें कापड लावलेलें असतें. हें कापड उन्हाळ्याच्या दिवसांत फार सुखावह होतें. फ्रान्स, ईजिप्त, ब्रिटिश ईस्ट आफ्रिका आणि मेसापोटेमिया या रणक्षेत्रांवरुन जे लष्करी अधिकारी परत आले आहेत त्यांनी आपलें असेंच मत आमच्यापाशीं प्रदर्शित केलें आहे.

आर्डेनन्स खात्यानें आखून दिलेल्या नमुन्याप्रमाणें कानपूर गिरणी माल न वापरतां कमी दर्जाचा माल मसाला वापरते व तो माल तपासणी कामदाराकडून पसंत ठरून मुंबईस येतो. कानपूर येथील तपासणारानें तपासलेला माल कमी दर्जाचा आहे असें आम्ही पुष्कळवेळां आर्डेनन्स खात्यांस तारेनें कळविलें आहे. खुंट्या, काठ्या व हातोडे पुष्कळ वेळां अगदी नासलेल्या लाकडाचे बनविले असल्यामुळें फेकून देण्यांत आले आहेत. आम्ही म्हणतो असला नासका माल त्यावेळीं मुंबईस व डॉकमध्यें असलेल्या कामदारांनी पाहिला असता तर त्यांनीं आम्ही म्हणतो त्यास दुजोराच दिला असता. आर्डेनन्स खात्याच्या दहाबारा ठिकाणीं जसा माल पुरविला जातो त्याहून बऱ्याच कमी दर्जाचा माल कानपूर गिरणीकडून मुंबईस पुरवठा केला जातो असे मुंबईच्या डेपोची अकस्मात तपासणी केली तर आढळून येईल.

रावळपिंडी, फेरोझपूर, दिल्ली, आग्रा आणि अलाहाबाद येथें हिंदी मक्तेदार आज कित्येक वर्षे संतोषकारक तंबूंचा पुरवठा करीत आहेत. हे तंबू अनुभवी अशा अर्सेनल खात्याच्या कामदारांकडून तपासले जातात. हिंदुस्थान व बाह्य देशीं माल पाठविण्याच्या आर्डेनन्स खात्यांत मुंबई व कानपूर येथेंच दोन स्वतंत्र तपासणीदार काय म्हणून नेमण्यांत आले आहेत हें आम्हांस समजत नाहीं. अशा प्रकारच्या तपासणीच्या कामी आर्सेनलासंबंधीं अननुभवी अशा कामदाराची नेमणूक नसावी असें आम्हांस वाटतें. मुंबईचा कामदार अगदींच कच्चा आहे व त्यास ब्रम्हदेशांतील इमारती लाकडाशिवाय कसलाही अनुभव असेल असें आम्हांस वाटत नाहीं. या कामदाराच्या नेमणुकीमुळें आमचा सर्व कारभार बंद ठेवावा लागला आहे. याच्या जागीं आर्सेनल खात्यांतील अनुभवी कामदार नेमण्यांत आला असता तर ही परिस्थिती टाळतां आली असती. यावरून मालाची तपासणी करण्यांत व योग्य तोच पसंत करण्यांत आर्सेनल खात्यांतील अनुभवी माणसांचीच नेमणूक होणें रास्त आहे हें निर्विवाद ठरतें.

खडकी येथील अर्सेनल खात्यानें नमुना म्हणून दिलेला व एलजिन गिरणीनें तयार केलेला तंबू आमच्या जवळ अद्याप आहे. या तंबूशीं आम्ही तयार केलेल्या तंबूची तुलना केल्यास आमचा तंबू दीडपट चांगला ठरेल. इतर गिरणी कारखानदारांनी पुरवठा केलेल्या तंबूचीही हीच स्थिती आहे.

लढाईच्या दिवसांत दरांत जास्त मागणी करून आम्ही सरकारास अडविलें नाहीं याबद्दल आम्ही आपणांस धन्य मानून घेत आहोंत.

आर्डिन्स खात्याला लागणाऱ्या मालाचा पुरवठा करण्यांत मुंबईच्या अननुभवी कामदारानें आमच्या पुरवठ्यांत खो घातला नसता तर आज सरकारचे कित्येक लाख रुपये दर वाढविल्यामुळें व मालाची ने आण केल्यामुळें जे खर्च झाले ते वाचले असते. तसेंच रेल्वेखात्यासही डबे, कोळसा आणि एजिन्स याच्या चमत्कारिक अडचणीमुळें डब्यांची जुळवाजुळव करण्याची विनाकारण दगदग पडली नसती.

---

# हिंदी धाडसाची गळचेपी.

१२. न्यायी, समता आणि सर्व साधारण वागणूक मिळावी म्हणून आमची एवढीच विनंति आहे कीं, रावळपिंडी, फेरोझपूर, दिल्ली, आग्रा आणि अलाबाद येथील तंबू तयार करण्याचे फार काळपर्यंत स्थापन झालेले हिंदी कारखाने तंबूंचा पुरवठा संतोषकारकरीतीनें करीत होते आणि ज्यांस धंद्याच्या वाढीच्या एक पंचमांश मागणीचाच पुरवठा करण्यांत येत होता म्हणजे एकाचवेळीं ५०० ते २०० तंबूंची मागणी करण्यांत येंत होती, त्यांनीं जास्त मागणीचा पुरवठा करा अशी विनंति केली असतां सिमला येथील अधिकाऱ्यांकडून त्यांस नकारात्मक उत्तर मिळतें आणि या पुरता ४८ तासांचाही अवधी गेला नाहीं तोंच कानपूरच्या लाडक्या गिरणीस १००० ते १५०० तंबूंचा पुरवठा करण्याची मागणी करण्यांत येते ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. ही सरकारी मागणी दर तंबूच्यामागें ८० ते ९० रुपये खोट खाऊन करण्यांत येंतें ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. या गोष्टीचा परिणाम एकतर रयतेच्या पैशाची उधळपट्टी झाली आणि दुसरा जे हिंदी कारखानदार आपला धंदा मोठ्या उत्साहानें आणि नेटानें कायदेशीर मर्यादेंत चालवीत होते त्यास निरुत्साह व बेउमेद करण्यांत आलें.

१३ आम्ही २०,००० लहान मोठे तंबू व त्यांस लागणारें इतर किरकोळ सामान पुरविलें आहे. एक क्षणाचाही विलंब न करतां आम्ही ' हेड स्टॉल्स ' हिंदुस्थानांत कोठेंहि इतके स्वस्त मिळणार नाहींत अशा भावानें पुरविले आहेत. अशाप्रकारें आम्ही पुरवठा केला नसता तर निरनिराळ्या रण क्षेत्रावर मालाचा पूर्ण पुरवठा झाला नसता. जे ' हेड स्टॉल्स ' आम्ही पुरविले तेच हेड स्टॉल्स कानपूर व इतर कारखानदारांस पुरवितां आले

नाहींत याचें कारण त्यावर नफा फारच थोडा होता आणि तंबूंचा पुरवठा करण्यांत जास्त फायदा होता.

१४ एकंदरीनें इ. स. १८७२ च्या पूर्वी तंबू पुरविण्याचा अग्राधिकार फत्तेगड आणि जबलपूर येथील मक्तेदारांस मिळाला होता यावेळीं मुंबईस तंबू तयार करण्याचा कारखाना नव्हता. पण या धंद्याला उत्तेजन मिळावें म्हणून सरकारच्या विनंतिवरून आम्ही हा धंदा मोठें धाडस करून आमच्या कारखान्यांत सुरू केला आणि तेव्हांपासून आर्डेनन्स खात्यास आम्ही हा माल संतोषदायक पुरवीत आहोत. अनुभवाच्या आभावी ज्यांस या धंद्याचें मर्म समजलें नाहीं अशा युरोपियन कारखानदारांस या लढाईच्या दिवसांत आम्हांस व आमच्या सारख्या इतर हिंदी कारखानदारांस बळी देऊन प्रोत्साहन देण्याची जी पद्धति सुरू करण्यांत आली आहे त्याबद्दल आमच्या अंत:करणांत पीळ पडत आहे. या पद्धतिसंबंधानें आम्ही पुष्कळ वेळां ओरड केली आहे पण ती व्यर्थ गेली आहे. या प्रकरणीं आमचें म्हणणें सिद्ध करण्यासाठीं कशाही प्रकारची चांचणी किंवा चवकशी करण्यांत यावी. या चवकशींत आम्ही असें सिद्ध करून देण्यास तयार आहोंत कीं, एका महत्वाच्या धंद्यास आम्ही हिंदी कारखानगांनी सुरुवात केली असतां केवळ निवडीच्या आभावी आम्ही अपात्र ठरलों आहोंत आणि हा अपात्रपणा असाच पुढें चालू राहील तर निर्भेळ स्वदेशी धंदा कायमचा ठार मारला जाईल आणि कमी दर्जाचा माल पदरीं बांधून घेऊन जनतेच्या पैशाची विनीयोग विनाकारण अनाठायीं होईल व हल्लीं तसा झालाही आहे.

---

# चांमड्याचे मक्ते.

या देशांत चांमड्याच्या हिंदी कारखानदारांस उत्तेजन देण्याच्या ऐवजीं निरुत्साह कसें करण्यांत येतें आणि त्यांच्याशीं स्वर्धा करणाऱ्या युरोपियन कारखानदारांस फाजील प्रोत्साहन कसें देण्यांत येतें यासबंधानें दोन शब्द लिहावेसें वाटतात.

धी वेस्टर्न इंडिया आर्मी बूट अॅन्ड इक्वीपमेंट फ्यॉक्टरी ( सीव ) मुंबई हा कारखाना इ. स. १८८७ सालीं सुरू करण्यांत आला. अशा धंद्यांत कोणीही आपलें भांडवल घालण्यास तयार होईना म्हणून हिंदुस्थान सरकारास या पदार्थांचा पुरवठा करण्यासाठीं त्याच सरकारानें आमच्या पेढीस हा धंदा सुरू करण्यास विनंति केली.

हा कारखाना प्रथम फारच लहान होता. त्यावेळीं फक्त एक लहानसें झोंपडें होतें.

हा कारखाना हळू हळू वाढविण्यांत आला, मोठमोठालीं खातीं सुरू झाली रंगविण्याचे शेकडों हौद तयार करण्यांत आले आणि सरकारच्या सांगण्यावरून यंत्रादि सामानांत लाखो रुपये अडकविण्यांत आले. चामड्याचे तज्ज्ञ असे बडे बडे कामगार कामावर लावले व कारखान्यांत उत्तम माल निघावा म्हणून विलायतेहूनही कांहीं कामगार मुद्दाम मागविले.

सरकारच्या सांगण्यावरून अशा रितीनें कारखान्याची उत्तम अवस्था केली अलतां आणि त्या करतां लाखो रुपये खर्चीं घातले असतां त्याच सरकारानें दिलेला मक्ता इ. स. १९१० सालीं रद्द केला. करार अशारितीनें रद्द करण्यास कारण अगदीं क्षुल्लक म्हणून आलें. एका कामगारानें कांहीं नवीन अटी

घालण्याविषयीं सूचविलें व त्याबद्दल आम्ही कुरकुर केली. हा रद्दीचा हुकूम एकाएकीं देण्यांत आला ! खरोखर पहातां या संबंधानें आम्हांस विचारणा व्हावयास पाहिजे होती. हा रद्दीचा हुकूम हातीं पडण्यापूर्वी फारच थोड्या काळांत आम्ही या कारखान्यांत आणखी एकलाख रुपये टाकले होते. सुमारें १५ वर्षेंपर्यंत हिंदी सैन्यास लागणारा चामड्याचा अर्धामाल आम्ही पुरविला आहे.

या नंतर आम्ही वारंवार विनंत्या केल्या वरून नमुन्यादाखल कांहीं माल आम्ही पूर्ण संतोषकारक असा तयार करून दिला आहे.

लढाई सुरु झाली त्यावेळीं यूरोप खंडांत मी होतो लंडन शहरीं गेलों आणि इंडिया आफिसांत आणि लढाऊ खात्यांत अत्यंत उच्च अशा अधिकाऱ्यांत भेटलों. " तुह्मी सरकारास जीनें पुरवूं शकाल काय ? कारण इंग्लडने हिंदुस्थान सरकाराकडे जेव्हढी मागणी केली आहे त्याहून अधिक मालाची जरूरी आहे. ' असें मला विचारण्यांत आलें.

मी होय म्हणून सांगितल्यावरून इंडिया आफिसानें हिंदुस्थान सरकारास आमच्या कारखान्यांतून जीनें वगैरे माल मागविण्याविपयीं तार केली. इंडिया आफीसनें ही विनंती पुष्कळ वेळां हिंदुस्थान सरकारास केलेली आहे पण हिंदुस्थान सरकारानें या अत्यंत महत्वाच्या विनंतीकडे अद्यापपर्यंत लक्ष, दिलें नाहीं. तसेंच या संबधानें आम्हांकडेही विचारपूस झालेली नाहीं. हार्नेस स्यॅडलरी कारखान्यांतून जितका माल तयार होण्यासारखा नव्हता त्याबद्दलची मागणी कूपर आलन आणि कंपनी याजकडे करण्यांत आलेली आहे. या कंपनीनें तयार करून दिलेला माल संतोषकारक नसावा अशी आमची समजूत आहे.

आमच्या कारखान्यांत लष्करास लागणारे बूट इ. स. १९०० च्या पूर्वीपासून तयार होत होते. लष्करास लागणाऱ्या बूटांपैकीं कांहीं मागणी आमच्याकडे करा असें सांगण्यासाठीं आम्ही सरकारची गांठ घेतली. पण यावेळीं आमची वितंति मान्य करण्यांत आली नाहीं. गेल्या बोअर लढा-

ईत सरकारास बुटांची जरूरी होती व आह्मी विनंतिही केली होती पण त्याचा कांहींच उपयोग झाला. त्यावेळीं दक्षिणेंत कमांडर इन् चीफचें काम करीत असलेले लार्ड रॉबर्ट यांची आम्ही मुलाखत घेतली व ' माल त्वरित करून देतों' अशी विनंति केली. ही आमची विनंति मान्य करण्णांत आली व आमच्या कंपनीनें पुष्कळसे बूट तिकडे पाठविले व त्या बुटांबरोबर कंपनीचा मेंबर म्हणून मलाही जाण्यास सांगितलें. हे बूट घेण्यांत आले व त्याबद्दल संतोष प्रदर्शित करण्यांत आला. नंतर मी इंग्लंडमध्यें गेलों व लंडन येथें लढाऊ खात्याच्या मुख्यास भेटलों. यावेळीं बुटांची फार जरूरी होती यावेळीं आमच्या दोघांत करार बहुतेक पुरा झाला होता पण कांहीं किलमिष राहिलें होतें त्यासंबंधानें हिंदुस्थान सरकारास विचारतांच ' ज्या अर्थी सदरहू कारखाना मुंबईत आहे त्या अर्थी त्या कारखान्याशीं हिंदुस्थान सरकारच करारमदार करूं शकतें ' असा हिंदुस्थान सरकारानें जबाब दिला. पुरवठा करण्याच्या करारासंबंधाने आम्ही यापुढें हिंदुस्थान सरकारशींच बोलणें केलें पाहिजे असें लढाऊ खात्यानें सांगितलें. यावेळीं लागणाऱ्या बुटांची मागणी माझ्या मागण्यावरून मिळाली होती पण ती इकडे येतांच मेसर्स कूपर, आलन आणि कंपनी यांस देण्यांत आली; आणि या विषयासंबधानें आमचाशीं काहींच पत्र व्यवहार करण्यांत आला नाहीं. हीं मागणी अलन कंपनीच्या हातीं पडण्यापूर्वी त्यावेळचे हिंदुस्थानचे व्हाईसराय लार्ड कर्झन यांची मुलखात आमच्या कारखान्याच्या मुखत्याराकडून घेण्यांत आली व या मुलाखतींत ही विलायती मागणी आमच्या मुखत्यारानें कशी मिळविली वगैरे हकीकत सांगितली. ' आपला कारखाना पहाण्यास मी लवकरच येतो ' असें त्यांनी त्यावेळीं सांगितलें पण शेवटीं निराळ्याच मार्गानें वजन खर्च झालें म्हणून त्यांस आमच्याशीं स्पर्धा करणाऱ्या कारखान्यांत नेण्यांत आलें. हे लार्ड साहेब आजपर्यंत आमच्या कारखान्यांत कधींच आले नाहींत व कारखान्याची चवकशीही करण्यांत आली नाहीं.

ही गोष्ट घडल्यानंतर लवकरच दहा वर्षे मुदतीचा अलन कंपनीशीं केलेला करार पुरा होत होता. ही मुदत अतीशयच होय. या प्रकरणीं आह्मी हिंदुस्थान सरकाराशीं पत्रव्यवहार केला तेव्हां ' टेंडरें मागविण्यांत येतील ' असें उत्तर मिळालें. असें असतांही टेंडरें वगैरे न मागवितां अलन कंपनीस आणखी दहा वर्षांचा मक्ता देण्यांत आला. मुंबईचे माजी गव्हरनर लार्ड सिडेनह्याम यांजकडे या प्रकरणा संबंधानें आह्मी पत्रव्यवहार केला. त्यांनी 'एक अर्ज पाठवा' असें ममताळूपणानें उत्तर पाठविलें. याप्रमाणें आह्मी अर्ज केला व त्यांनी उत्तम शिफारस करून हा अर्ज पुढें रवाना केला; आणि ते स्वत: सिमल्यास गेले होते तेव्हांही त्यांनी या प्रकरणीं उचल केली होती परंतु इतक्या बड्या माणसानें आपलें वर्जन खर्च केलें असतांही आमच्या प्रतिस्पर्धी कारखानदाराचें वजन याहूनही जास्त पडल्यामुळें आमच्या न्यायी मागणीचा कांहींच उपयोग झाला नाहीं.

या नंतर थोड्याच दिवसांनी हिंदुस्थान सरकारास टेंडरें मागविणें भाग झालें. हीं टेंडरें इ. स. १९११ सालीं मागविण्यांत आलीं. टेंटरें पाठविण्या संबंधानें जे नियम आहेत त्या प्रमाणें अलन कंपनी वागू शकली नाहीं व तिचें दरही भारी होते. यावेळीं आमचें टेंडर मंजूर करण्यांत आलें असतें तर १२ लाख २५ हजार रुपये सरकारचा फायदा झाला असता. कांहीं अदृश्य कारणांनीं टेंडरें पुन: मागविण्यांत आलीं. यावेळींही आमचें टेंडर कमी दराचें होतें व वरील प्रमाणांतच सरकारचा फायदा झाला असता.

हा सर्व प्रकार असा झाला असतां आणि दर अधिक असतांही अलन कंपनीसच १० वर्षे मुदतीचा मक्ता देण्यांत आला. लढाई सुरू झाल्यानंतर पहिल्या वर्षी किंवा त्या सुमारास बुटांच्या पुरवठ्या संबंधानें सरकाराकडे पत्रव्यवहार केला असतां व त्यांचे कांहीं उत्तर न मिळतां इ. स. १९१५ पर्यंत एका लहानशा मागणीशिवाय आमच्याकडे मुळीच मागणी करण्यांत

आली नाहीं. या दिवसापासून आतांपर्यंत साधारण एक लाख बुटाची मागणी करण्यांत आली आहे व ती आम्ही पुरविली आहे.

ही एक लाखाची मागणी आम्ही तयार करीत असतां आम्ही सरकाराशीं नव्या मागणी बद्दल विचारपूस करीत होतों. या नव्या मागणीच्या अटी वगैरे ठरून पुऱ्याही झाल्या होत्या. इंडियन म्यूनिशन बोर्ड नवें स्थापन झाल्यामुळें आमची नक्की ठरलेली मागणी त्या खात्याकडे गेली आणि हें बोर्ड ती मागणी एक तृतियांशानें कमी करण्याचा प्रयत्न करीत आहे. या सर्व प्रयत्नांचा हेतू काय हें आम्हांस तरी समजत नाहीं पण युरोपियन कारखान- दारांचा फायदा झाला हा मात्र त्या प्रयत्नांचा परिणाम घडला आहे. सरका- रास ज्या प्रकारचे बूट किंवा इतर चामड्याचे जिन्नस पाहिजे असतात त्या बरहुकूम माल तयार करून देण्याचे औद्योगीक कारखाने हिंदुस्थानांत आहेत; जसें मद्रासची क्रोमेलेदर फ्याक्टरी, ग्वाल्हेर येथील फ्याक्टरी, कटक येथील कारखाना वगैरे. शांततेच्या वेळीं कानपूरच्या गिरणीनें अशा प्रकारचा जितका माल सरकारास पुरवठा केला होता त्याच्या बारापट माल त्या गिरणीनें आज सरकारास पुरविला आहे. यांपैकीं एक तृतीयांश माल इतर कारखानदारांत वाटला गेला असता तर त्यांत सरकारची वाहवा झाली असती आणि हिंदी कारखानदार ज्या प्रोत्साहनास योग्य झाले आहेत तें प्रोत्साहनही त्यांस मिळालें असतें. आज हे कारखानदार युरोपियन कारखा- नदारांस फाजील प्रोत्साहन दिल्यामुळें साधन असतां निरुत्साहानें टाळ्या वाजवीत दिवस कंठीत आहेत. आज ज्या कारखानदारांस सरकारानें बगलेंत मारले आहे त्यांच्याहून ज्यास्त दर्जाचा नसेल तर निदान त्यांच्या बरोबरीचा माल आमच्या कारखान्यातून तयार होतो कीं नाहीं हें आजमावून पहाण्यास आम्ही वाटेल ती परीक्षा देण्यास तयार आहेत.

शेवटीं माझें एवढेंच सांगणें आहे कीं, औद्योगिक कमिशनचे अध्यक्ष सर

थामस हॉलंड हे जेव्हां म्यूनिशन बोर्डाचे मेंबर झाले तेव्हां ' आमच्या कारखान्यांत जो माल तयार होतो तो लढाईच्या कामीं लागणाऱ्या निरनिराळ्या वस्तूंच्या इतका सुबक तयार होतो कीं नाहीं हें अजमावून पहाण्यासाठीं आमचा कारखाना एक वेळ पहा ' अशी त्यांस मी इच्छा प्रदर्शित केली होती. आमच्या कारखान्याजवळचे कारखाने पहाण्यास सवड झाली असतां कदाचित माझाच कारखाना पहाण्यास त्यांस सवड झाली नसेल हें मी कबूल करतों- पण त्यांनी आमचा कारखाना पाहिला असता तर आम्हांस अन्यायानें वागविण्यांत येत आहे असें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें असतें आणि रयतेचे लाखो रुपये वाचल्याचें श्रेय आमच्या सरकारास मिळालें असतें.

---

# मि. करीमभाई यांचा तोंडी जबाब.

औद्योगिक कमिशनपुढें मि. करीमभाई आदमजी यांणी दिलेला तोंडी जबाब ' मुंबई क्रॉनिकल ' वर्तमान पत्रांत प्रसिद्ध झाला आहे. तो येणेंप्रमाणें:-

आपणांस ता. १३ मिनहू रोजी साक्षीसाठीं बोलावलें असतां आपण आला नाहींत या प्रश्नाचें उत्तर अस्तिपक्षीं दिल्यावर पुढील जाब जबाब झाले.

**अध्यक्ष**:—तुमचा पुरावा ता. १३ रोजीं घेतला जाईल असें तुम्हांस ता. ३१ रोजीं कळविलें होतें ना ?

**साक्षीदार**:—होय.

**अध्य**:—मला या तारखेस येण्यास बनणार नाहीं असें तुम्ही ता. १२ पर्यंत सेक्रेटरीस कळविलें नव्हतें ?

**साक्षीदार**:—सेक्रेटरीचें पत्र जरी एक तारखेचें होतें तरी तें मला ६ तारखेपर्यंत मिळालें नव्हतें; मी बाहेरगांवीं गेलों असल्यामुळें मला तें १०।११ तारखेस मिळालें. मी त्याचें १२ तारखेस उत्तर लिहिलें.

**प्रेसि:**—तारीख नेमण्याच्या कामीं तुम्ही आम्हांस अडचणींत आणलेंत.

**साक्षी:**—मला आलेल्या पत्रांत ' सुचविलेली तारीख व जागा सोईवार होईल की नाहीं ' असें लिहिलें होतें म्हणून तें ज्या अर्थी माझ्या सोईवर सोपविण्यांत आलें होतें आणि त्या दिवशीं ज्या अर्थी मला येता येत नव्हतें त्याअर्थी मी तसें एक दिवस अगोदर सेक्रेटरीस कळविलें आणि तुम्हांस विचारून दुसरा दिवस नेमावा असें त्यांत सूचविलें होतें.

**अध्यक्ष:**—कमिशनचें महत्व आणि त्यांतील मेंबरांची सोय तुम्ही कांहींच विचारांत घेतली नाहीं.

**साक्षी:**—या गोष्टीचा इतका परिणाम घडेल असें, सरथॉमससाहेब मला त्यावेळीं वाटलें नाहीं.

**अध्यक्ष:**—तुह्मी सेक्रेटरीस जें दुसरें पत्र लिहिलेंत त्याच्या २ऱ्या पाऱ्याग्राफांत वावरावयास पाहिजे तशी आदबीची भाषा वापरली नाहींत.

सेक्रेटरी साहेबांनी जितक्या आदबीनें पत्र लिहिलें आहे तितक्याच आदबीनें मीं उत्तर लिहिलें आहे अशा अर्थाचें मि. करीम भाई यांणी उत्तर दिलें.

**अध्यक्ष:**—आपली साक्ष जाहीर रितीनें व्हावी अशी आपली इच्छा आहे काय ?

**साक्षी:**—होय.

**अध्यक्ष:**—ज्या अर्थी साक्षीदारानें कांहीं विविक्षित व्यक्तीवर दोषारोप केले आहेत अर्थी त्यांची साक्ष ' गुप्त ' घ्यावी असें माझें मत आहे.

**साक्षी:**—उपस्थित झालेला प्रश्न सार्वजनिक हिताचच आहे म्हणून माझी साक्ष जाहीर रितीनें व्हावी.

**अध्यक्ष:**—सर आदमजी केव्हां मरण पावले ?

**साक्षी:**—ते इ. स. १९१३ त वारले.

**अध्य:**—तेव्हां पासून व्यवस्थेंत फरक झाला आहे नव्हें ?

**साक्षी:**—मुळींच नाहीं. त्यांच्या मृत्यूच्यापूर्वी १५ वर्षें ते जरी अधिक कालीन मेंबर होते तरीं त्यांनी कारखान्याच्या व्यवस्थेंत कांहींच भाग घेतलेला नाही. त्यांनी ती सर्व व्यवस्था आमच्यावर सोपविली होती आणि सर्व गोष्टी आम्हीच करीत होतो.

**अध्यक्ष:**—विविक्षित कामदारांवर जे एकंदर आरोप करण्यांत आले आहेत त्यांची पूर्ण चवकशी करण्यास त्या कामदारांस साक्षीस बोलाविलें पाहिजे तेव्हां असें करण्यास हें कमिशन समर्थ नाहीं.

**साक्षी:**—असें असेल तर कमिशन ज्या ठिकाणीं मला साक्षीस बोलवील त्या ठिकाणीं मी येण्यास तयार आहे.

**अध्यक्ष:**—ज्या कामदारांवर आरोप करण्यास आले आहेंत त्यांचे यावर काय म्हणणें आहे हें ऐकून घेण्यापूर्वी कमिशन या केलेल्या आरोपांचा विचार करूं इच्छित नाहीं. यासाठीं सार्वजनिक हिताच्या जेव्हढ्या बाबी असतील तेवढ्या पुरतीच तुम्ही साक्ष द्यावी. ज्या कामगारांबद्दल तुमची तक्रार असेल त्याबद्दल तुम्ही त्यांच्याकडे कागाळी करावी.

**साक्षी:**—याच कारणासाठीं मी माझ्या लेखी जबाबांत विस्तृत विवेचन केलेलें नाहीं. साधारण रूपरेषा दाखविली आहे. हिंदीकारखानदारांचें नुकसान करून युरोपियन कारखानदारांस फाजील आवड दाखविण्यांत येईल अशा प्रकारची पद्धत अनुसरण्यांत आली आहे. हें माझें म्हणणें तंबू व चामड्यांचें जिन्नन यासंबधानें आहे.

**अध्यक्ष:**—सरकारानें पसंत केलेल्या मक्तेदारांत तुमचें नांव आहे काय?

**साक्षी:**—सरथॉमस, होय, आपण काय हेतूनें प्रश्न विचारीत आहा हें आतां मला समजलें. या मुद्यासंबंधानें आणखी प्रश्न विचारण्यापूर्वी या मुद्यावर माझें काय म्हणणे आहे तें मी आपणांस सांगतो. मीं लेखी जबाब

दिला आहे त्या संबधाच्या फायली मी आणल्या आहेत पण आपण ज्या मुद्या-वर प्रश्न विचारीत आहा त्याबद्दलच्या फायली आणल्या नाहींत. त्या मला आणल्या पाहिजेत. तेव्हां तुमच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यासाठीं त्या फायली आणण्यास मला वेळ देण्यांत यावा.

**अध्यक्ष:**—पहा, तुम्हांलाही तीच अडचण भासली. याचप्रमाणें काम-दारांसही आपलें समर्थन करण्यास वेळ पाहिजे असतो.

यावेळीं साक्षीदारानें अशी विनंति केली कीं, सर थॉमस यांणी सिमल्यास जाण्यापूर्वी आमच्या कारखान्यांत एकदा येऊन जावें. असें केलें असतां सिमल्याच्या विरुद्धपक्षीय लोकांची भेट होण्यापूर्वी त्यांनी ( लोकांनीं ) आम-च्याशीं कसें वर्तन ठेवलें होतें हें दिसून येईल.

नानंतर अध्यक्षांनी मान्य केलेल्या सरकारी मक्तेदारांची यादी वाचून दाखविली आणि अशी टीका केली कीं यांत युरोपियनपेक्षां हिंदी मक्तेदारच जास्त आहेत.

ही यादी वाचून दाखविल्यावर मि. करीमभाई यांनी असा प्रश्न केला कीं या हिंदी मक्तेदारांस जे सक्ते देण्यांत आले त्यांची संख्या किती आहे.

‘ असे मला करतां येत नाहीं ’ असें अध्यक्षांनी उत्तर दिले.

**साक्षी:**—याच ठिकाणी तर ग्यानबाची मेख आहे.

**अध्य:**—तुम्हांस एक लाख बुटाची आर्डर होती नव्हे ?

**साक्षी:**—होय.

**अध्य:**—ही आर्डर कधीं मिळाली ?

**साक्षी:**—गेल्या सप्टेंबरच्या मागील सप्टेंबरांत. ती गेल्या मार्चमध्यें पुरी करून द्यावयाची होती.

**अध्य:**—मग ती तुम्ही कधीं पुरी करून दिलीत ?

**साक्षी:**—गेल्या आगष्ट किंवा सप्टेंबरांत.

## अध्यक्षांचीं अनुमानें.

**अध्य:**—आगष्ट किंवा सप्टेंबर यापैकीं नकी कधीं हें तुम्हांस आठवत नाहीं.

**साक्षी:**—नाहीं आगष्ट किंवा सप्टेंबर.

**अध्य:**—तर मग ठरलेल्या मुदतींत तुम्ही आर्डर पुरी करूं शकला नाहींत असेंच ना ?

**साक्षी:**—गेल्याच्या मागील अक्टोबरांत कर्नेल. थॉमस मुंबईस आले आणि त्यांनी माझ्याजवळ आणखी बुटाची आरडर घेऊं शकाल काय अशी पृच्छा केली. यावर मी म्हणालों कीं, होय नवी आरडरही घेऊं शकेन मात्र मला नवे कारागीर कामावर ठेवण्यासाठीं वेळ मिळावा म्हणून वेळ दिला पांहिजे. पूर्वी ठरल्याप्रमाणें मी त्यांस या प्रश्नाबद्दल पत्र लिहिलें. 'कारखान्यांत जे कामदार काम करीत आहेत त्यांस काम मिळावें म्हणून ही नवी आरडर देण्याची घाई करावी ' असें मी त्यांस लिहिलें होतें. कुशल कामदार चुटकी सरशे मिळत नसतात आणि जर ते एकदा काम नाहीं म्हणून कारखाना सोडून गेले तर त्यांस परत कामावर बोलावणें मुष्किलीचें होतें.. याच हेतूनें आणि कर्नल थॉमस यांस सांगून सवरून हातीं असलेल्या आरडरीचें काम दिरंगाईनें चालू ठेविलें होतें ? या प्रश्नाचा निकाल लरून घेण्यास मला ७।८ महिने लागले. पण अलन कंपनीस सिमल्यास जाऊन काम तेथल्या तेथेंच झटकन करून घेण्याचीं साधनें होतीं. दुर्दैवानें अशीं साधनें आमच्यापारीं नाहींत.

---

# आव्हानाची टाळाटाळ.

**अध्य:**—या प्रश्नाशीं अम्हांस यावेळीं कांहींच करावयाचें नाहीं.

**साक्षी**:—मला या प्रश्नाची छाननी करावयाची आहे. असें केलें असतां खऱ्या गोष्टी उजेडांत येतील.

**अध्य**:—मला या प्रश्नाच्या अंतरंगांत जावयाचे नाहीं.

**साक्षी**:—तें खरें पण त्या अंतरंगांत जाणें जरूरीचें आहे. तसेंच मी जें काय सांगेन त्याचा मजजवळ पुरावाही आहे.

**अध्य**:—सरकार हिंदी कारखानदारांस उत्तेजन देत नाहीं याबद्दल तुमची तक्रार आहे. पण कांहीं कारखानदारांस सरकारानें आरडरी दिल्या आहेत ही गोष्ट खरी नाहीं काय ?

**साक्षी**:—कांहीं हिंदी कारखानदारांस अशा आरडरी देण्यांत आल्या आहेत हें खरें पण येंथें मला हें स्पष्ट सांगितलें पाहिजे कीं, ते कारखाने जितका माल तयार करूं शकतात त्या प्रमाणांत त्या दिलेल्या आरडरी नाहींत.

**अध्यक्ष**:—या तुमच्या म्हणण्याचा अर्थ काय ?

**साक्षी**:—जे कारखादार सहा आण्याचें काम करूं शकतात त्यास एक पैच्या किंमतीचेंही काम दिलेलें नाहीं हें करणें न्याय्य आहे असें ह्मणतां यावयाचें नाहीं. प्रत्येक कारखानादारांस त्याच्या साधनाप्रमाणें आणि वकुबी प्रमाणें काम दिलें गेलें पाहिजे.

**अध्यक्ष**:—अम्मू निशन बूट तयार करण्याची आरडर तुम्हांस मिळाली कीं नाहीं ?

**साक्षी**:—होय, मी माझा लेखी जबाब दिल्या नंतर ती मिळाली आहे.

यानंतर साक्षीदारानें सांगितलें कीं, हा करार क्कॉटर मास्तर जनरल जवळ तीन लाख जोडाबद्दल फार पूर्वी झाला होता. हें प्रकरण निदान बोर्डाकडे गेल्यावर त्या बोर्डानें अम्हांस कळविलें कीं फक्त २ लाख बुटांचीच आरडर आपणांस दिली जाईल आणि ही आरडर जर कबूल करण्यांत न येईल तर सरकाराकडून सर्व आरडर रद्द केली जाईल अशी त्याच पत्रांत

धमकी दिली होती. कराराच्या शर्तीप्रमाणें आरडरीहून ५० टक्के जास्त देणें किंवा न देणें आमच्या खुषीवर आहे तेव्हां मागणीचा आकडा फिरविणें म्यूनिशनबोर्डास शक्य नाहीं. ही आरडर म्युनिशनबोर्डानें आतां कबूल केली आहे व त्यांत ५० टक्याची वाढीबद्दलची आमची खुशी मंजूर करण्यांत झाली आहे.

आपल्या पुराव्यांत भर घालतांना साक्षीदार सांगतो—हिंदी कारखानदारांस तंबूची जी आरडर मिळते ती एकाच वेळीं ५० किंवा ७५ तंबूची असतेच. ही आरडर पुरी झाल्यावर दुसरी मिळेपर्यंत त्यांस हात जोडून बसावें लागतें पण कानपूरच्या गिरणीला ही आरडर प्रत्येक वेळीं १५०० पासून २००० पर्यंतची असते.

---

## त्या गोष्टी गुप्त ठेवा.

**अध्यक्षः**—विविक्षित कामदारावरील आरोप जनतेपुढें ठेवण्याची काय गरज आहे हेंच मला समजत नाहीं.

**साक्षीः**—या सर्व गोष्टी जनतेंत का बोलूं नये ? ही चबकशी उघड्या दरवाज्यानें होत आहे तेव्हां त्या गोष्टी गुप्त ठेवण्याची जरूरी आहे असें मला वाटत नाहीं.

**अध्यक्षः**—मी त्या गोष्टी गुप्त ठेवण्यास सांगतों याचें कारण एव्हढेंच कीं ज्या कामदारांवर तुम्ही आरोप करीत आहांत त्यांस आपलें समर्थन जनतें पुढें ठेवण्यास संधी मिळालेली नाहीं.

**साक्षीः**—माझ्या आरोपांबद्दल कामदारांस जर कांहीं स्पष्टीकरण द्यावयाचें असेल अगर ते खोटे पाडावयाचे असतील तर त्यांनीं तसें करण्यांस उघडपणें पुढें यावें. मी जें काय लिहिलें आहे तें परत घेण्यास मी तयार नाहीं.

अध्यक्षः—तुम्ही तें परत घ्या असें माझें म्हणणें नाहीं. पण मला जें काय सांगावयाचें आहे तें इतकेंच कीं हे आरोप प्रसिद्धपणें करण्यांत येऊं नयेत. आपण केलेल्या आरोपांची चवकशी सरकार खात्रीनें करील हें मी आपणांस सांगतो. कोणाही कामदारावर व्यक्ति विषयक आरोप ऐकण्याची आमची इच्छा नाहीं. कमिशनमार्फत होणाऱ्या साक्षींत कोणाही कामगारांवर केलेले व्यक्ति विषयक आरोप प्रसिद्ध होण्याची जबाबदारी हें कमिशन घेण्यास तयार नाहीं.

## पत्रकारांस ताकीद.

यानंतर अध्यक्ष हजर असलेल्या वर्तमानपत्रांच्या मुखत्यारांकडे वळले आणि या आरोपांची प्रसिद्धी करण्याच्या जबाबदारी बद्दल त्यांस त्यांनी ताकीद दिली.

**मि. करीमभाईः**—पत्रकाराशीं चाललेलें आपलें भाषण संपलें काय ?

**सर थॉमसः**—होय.

**मि. करीमभाईः**—मी ती गोष्ट पत्रकारांच्या खुषीवर ठेवतों. मी केवळ त्यांस सूचना केली आहे. व जबाबदारीची जाणीव करून दिली आहे.

शेवटीं अध्यक्षांनी मि. करीमभाईला अशी खात्री दिली कीं सरकार कोणत्याही कारखानदारासंबंधानें पक्षपाती नांहीं इतकेंच नाहीं तर त्या सर्वांस न्यायाप्रमाणेंच काम मिळावें असें मनापासून इच्छितें.

---

## भारतभूषण ग्रंथप्रसारक मंडळी.

# भारतभूषण ग्रंथमाला.



# नियम व पुस्तकांचें सूचिपत्र.

संवत १९७४. शके १८३९.

मेसर्स पी. बी. पाठक आणि कंपनी.

सेक्रेटरी--भारतभूषण ग्रंथमाला.

ठाकुरद्वाररोड मुगभाटलेन गिरगांव मुंबई. नं. ४

# नियम.

—०—

१ **भारतभूषण ग्रंथमाला**—प्रवेश फी न भरतां फक्त नांवें नोंदवि-णारांस कायमचे आश्रयदाते समजले जाऊन त्यांना या मालेचीं पुस्तकें निम्मे किंमतीस मिळतात. या मालेचीं सर्व पुस्तकें आश्रयदात्यांनीं घेतलींच पाहिजेत असें नाहीं. पाहिजे तीं पुस्तकें मागवावीं.

२ **भारतभूषण ग्रंथमाला**—प्रत्येक पुस्तक १०० पानाचें सुबक टाइ-पावर छापलेले संपूर्ण अशीं ३ पुस्तकें किंमत ८ ते १२ आणे किंमतीचीं म्हणजे निम्मी किंमत ४-६ आणे अशीं ३ पुस्तकें सुमारें १। महिन्यांत प्रसिद्ध होत जातील. पो. व्ही. पी. सर्व खर्च माफ देऊन १ रुपयास तिन्हीं पुस्तकें पाठवूं.

३ **भारतभूषण ग्रंथमाला**—नांवें नोंदविण्याचें कारण नवीन ३ पुस्तकें दर १। महिन्यास तयार झाल्याबरोबर आश्रयदात्यांस कळविण्याकरितां आहे. तरी आश्रयदात्यांनी आपले नांव गांव पोष्ट जिल्हा वगैरे मराठी अथवा इंग्र-जीमध्यें सुवाच्य लिहून नांव नोंदवावें म्हणजे रजिष्टर नंबर कळवूं.

४ **भारतभूषण ग्रंथमाला**—पूर्वी प्रसिद्ध झालेल्या ३ पुस्तकाचे लाट यांपैकीं फुटकळ पुस्तक ग्राहकांस पाहिजे असल्यास पो. व्ही. पी. खर्च वेगळा पडेल तिन्हीं पुस्तकांचा लाट नवीन किंवा मागील घेणारांसच पो. व्ही. पी. खर्च माफ मिळेल फुटकळ पुस्तकास पो. व्ही. पी. खर्च निराळा आका-रला जाईल.

५ **भारतभूषण ग्रंथमाला**—आमचे आश्रयदात्यांस तिन्हीं पुस्तकें तयार झाल्याबरोबर स्वतंत्र पत्र पाठवून ताबडतोब कळवूं. त्याप्रमाणें, त्यानीं

पुस्तकें पाहिजेत किंवा नकोत याचा खुलासा तावडतोब ८ दिवसांत केला पाहिजे. आठ दिवसांत उत्तर न आल्यास पुस्तकें पाहिजेत. असें समजून १ रुपयाचे व्ही. पी. नें पाठवूं पोष्ट व्ही. पी. खर्च माफ ही सवलत फक्त ३ पुस्तकांचे लाट नवीन किंवा मागील घेणारापुरतीच स्वतःचा गौरव अथवा भूषण करून कोणास दूषणही द्यावयाचें नाहीं. अगाऊ वर्गणी किंवा प्रवेश फी भरून फसण्याची मुळींच धास्ती नाहीं किंवा मागील व नवीन प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें सर्व घेतलींच पाहिजे अशी अट नाहीं. जीं पसंत असतील तीं घेणें फक्त आपलें नांव नोंदून या मालेचे आश्रयदाते होण्यास सविनय विनंति आहे.

७ **भारतभूषण ग्रंथमाला**—वर्षांतून प्रसिद्ध होणारी सर्व पुस्तकें म्हणजे अंदाजानें पुस्तकांचे ११ लाट घेणारे कायमचे आश्रयदात्यांस दरवर्षी सुंदर क्यालेंडर, डायरी व १ रुपया किंमतीचें संग्राह्य पुस्तक अशीं बक्षिस मिळतील. नवीन होणाऱ्या आश्रयदात्यांनीं मागील प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचें लिस्ट मागविलें असतां फुकट पाठवूं.

८ **भारतभूषण ग्रंथमाला**—आश्रयदात्यांनीं पत्रव्यवहार करतांना प्रत्येक वेळीं आपला रजिष्टर नंबर घातल्याशिवाय पत्रव्यवहार करूं नये तरी प्रत्येक वेळी आपला रजिष्टर नंबर कळविण्याची मेहरबानी करावी.

९ **भारतभूषण ग्रंथमाला**—मोठमोठ्या शहरीं एजंट्स पाहिजेत व्यापारी बुकसेलर्स यांना भरपूर कमिशन मिळेल.

**मेसर्स पी. बी. पाठक आणि कंपनी.**

सेक्रेटरी--भारतभूषण ग्रंथमाला.

ठाकुरद्वारोड मुगभाटलेन गिरगांव मुंबई. नं. ४.

# भारतभूषण ग्रंथप्रसारक मंडळी

## विक्रीस तयार.

# भारतभूषण ग्रंथमाला.

# लाट नंबर १

### १ जर्मनीचे डावपेंच.

लेखक—कृष्णाजी काशिनाथ फडके.—अगदी स्वतंत्र अशा इंग्रजी ग्रंथाधारे लिहिलेले. चालू लढाईत मित्रसंघाविरुद्ध लढणारा समूह विशेषत: जर्मन क्षात्रतेजी पक्ष विलक्षण महत्वाकांक्षेने ओथंबलेला आहे हें या पुस्तकांत स्पष्टपणें दाखविलें आहे. किं. १२ आ सवलतीची किं. ६ आ.

### २ सशस्त्र दरवडखोर शालिमार.

लेखक—श्रीयुत नलिनीकान्त रॉय—शालिमारच्या गोष्टी सरदार, संस्थानीक, जाहागीरदार यांना फारच आवडतात. अशा तऱ्हेचा नायक मराठींत मागें झालेल्या व पुढें होणाऱ्या कोणत्याही कथानकांत दिसणार नाहीं. किं. १२ आ. सवलतीची किं. ६ आण.

### ३ राजस्थानची मूकसुंदरी.

लेखक—नलिनीकान्त रॉय. चित्तवेधक व मनोरंजक नवीन कादंबरी किं. ८ आ. सवलतीची किं. ४ आ.

लाट नंबर १ हीं तिन्ही पुस्तकें घेणारांस पो. व्ही. पी. खर्च माफ.

## मेसर्स पी. बी. पाठक आणि कंपनी.

सेक्रेटरी—भारतभूषण ग्रंथमाला.

मुगभाटलेन—ठाकुरद्वार रोड, मुंबई. नं. ४.

REFBK-0019171
REFBK-0019171